म. ग्रं. सं. ठाणें

विषय भ्र. व्या

संग्रहालय क्रमांक ३५ १०५

लेखक हरि परशुराम

पुस्तकाचें नांव महाराष्ट्र भाषेचे व्याकरण सार

सन

३५
सं.क्र.१०५

# महाराष्ट्र भाषेचे व्याक
# सार

[redacted]र.

(भाषा व्याकरण)

म. ग्रं. सं. ठाणें
विषय भाषा - व्याकरण
सं. नं.

लहान मुलांकरितां

हरिकृत

महाराष्ट्रभाषेचें

# व्याकरणसार.

किंमत दोन आणे.

.न आणे.

# महाराष्ट्रभाषेचें

# व्याकरणसार.

हरि परशुराम वागळे,

असिस्टन्ट मास्तर इङ्गलाईट स्कूल,

यांनीं केलें.

आवृत्ति दुसरी.

मुंबई,

"तत्त्वविवेचक" छापखान्यांत छापिलें.

इसवी सन १८९६.

किंमत दोन आणे.

[ हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून
कर्त्यानें आपले सर्व हक्क ठेविले आहेत. ]

# प्रस्तावना.

ह्या लहानशा पुस्तकांत विद्यार्थ्याला आवश्यक अशा सर्व गोष्टींचा उलगडा पूर्णपणें, थोडक्यांत व सुबोध रीतीनें करण्याचा यत्न यथाशक्ति केला आहे. यांतील नियम, व्यापक व सोप्या शब्दांनीं दिले आहेत. याच्या आरंभीं व्याकरणाचीं मूलतत्त्वें हें प्रकरण देऊन, त्यांत शब्दाच्या जाति नवशिक्याच्या मनांत चांगल्या ठसाव्या अशी योजना केली आहे. लिंगवचनांचे व्यापक तितकेच नियम देऊन नामांचीं अनेकवचनें प्रत्ययांसह दिलीं आहेत. सर्व-लिंगी व सर्वअंतीं नामांचीं सामान्यरूपें प्रत्ययांसह देऊन त्यांस चतुर्थी लावून दाखविली आहे. क्रियापदाचीं शुद्ध रूपें पंचवीस व संयुक्त रूपें अकरा देऊन, सर्वकाळीं व सर्व अर्थीं क्रियापदें प्रत्ययांसह दिलीं आहेत. वाक्याचे भेद संक्षेपानें सांगून प्रयोगरचना नियमबद्ध केली आहे. **पदानुक्रम, पदविकार, वाक्यालंकार** व पद्यांतील **शब्दांचीं रूपें** यांविषयीं योग्य माहिती दिली आहे. नामें, सर्वनामें, विषणें, क्रियापदें व अव्ययें क्रमवार चालवून एकाच शब्दाचें निर-निराळ्या योजनेवरून व्याकरण कसें बदलतें व कठीण वाक्याचें व्याकरण कसें करावें, याची स्पष्टता केली आहे. तथापि हा ग्रंथ निर्दोष नाहीं हें जाणून, ह्या नूतन जन्मलेल्या ग्रंथास सूचनेच्या दुग्धपानानें वाढवून हा जनसेवेला पात्र करणें परोपकारी विद्वानां-वर सोंपवितों; कारण त्यांच्या सुजनतेपाशीं अशी मागणी माग-ण्याचा प्रत्येक होतकरूचा हक्कच आहे. रा० रा० वि० कों० ओक यांनीं हा ग्रंथ वाचून एक महत्त्वाची सूचना केली, तीबद्दल त्यांचा मी आभारी आहें. व रा० रा० राजाराम शास्त्री हिरलेकर यांनीं वारंवार योग्य सूचना करून हा ग्रंथ शुद्ध करण्यांत फार मेहनत घेतली, ह्या त्यांच्या परोपकाराबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें.

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

हें व्याकरण मीं प्रथम लिहिलें तेव्हां हें छापण्यापूर्वींच रा० रा० वि० कों० ओक, रा० रा० बाळ यज्ञेश्वर शास्त्री व रा० रा० राजाराम शास्त्री ह्यांस ह्याची हस्तलिखित चोपडी दाखविली. त्यांनीं मेहेरबानीनें ती चोपडी लक्ष्यपूर्वक वाचून उपयुक्त सूचना केल्या व हें व्याकरण मेहरबान डायरेक्टर साहेब यांजकडे पाठविण्यास योग्य आहे असें सांगून त्यांनीं हें छापण्याविषयीं मजला उत्तेजन दिलें; त्यावरून मीं पहिली आवृत्ति काढून एक प्रत मध्यभागचे डायरेक्टर ऑफ धि पब्लिक इन्स्ट्रक्शन यांजकडे पाठविली. त्यांनीं ती प्रत पूना ट्रेनिंग कॉलेजचे मेहरबान व्हॉईस प्रिन्सिपाळ ना० बा० गोडबोले यांजकडे अभिप्रायार्थ पाठविली. व्हाइस प्रिन्सिपाळ गोडबोले यांनीं मीं पुस्तकाच्या प्रस्तावनेंत विद्वानांपाशीं मागणी मागितली ती लक्षांत आणून ती प्रत फारच बारकाईनें तपासून त्या प्रतींत अनेक ठिकाणीं महत्त्वाच्या सूचना केल्या व ती प्रत मजकडे परत पाठविली. तसेंच मेहरबान डायरेक्टर साहेब यांनीं माझ्या विनंतीवरून व्हाईस प्रिन्सिपाल यांचा लेखी अभिप्रायही मला पाठवून दिला. त्यावरून त्या सर्व सूचनांसंबंधी कांहीं अनुभविक मास्तरांचा व विशेषें करून ट्रेनिंगांतून नुकतेच तीन वर्षांचें सर्टिफिकेट मिळविलेले, प्रोफेसर गोडबोले यांचे शिष्य रा० रा० अनंत बल्लाल साकळकर यांचा विचार घेऊन ह्या दुसऱ्या आवृत्तींत सुधारणा केली आहे. शिवाय सुबोधतेसाठीं स्वतांला फेरफार करावासा वाटला तो केला आहे. हें पुस्तक मुंबई येथील म्युनिसिपालिटीच्या जॉइंट स्कूल कमिटीनें पसंत केलें आहे.

श्री

मुंबई, ता. ९ एप्रिल १८९९.

रा० रा० हरि परशुराम वागळे ह्यांस,

साष्टांग नमस्कार वि० वि०.

तुह्मीं लिहिलेलें मराठी भाषेचें व्याकरण मीं पाहिलें. चांगलें आहे. छापकें असतां विद्यार्थ्यांचे फार उपयोगी पडेल. कळावें लोभ असावा हे विनंति.

मित्र,

विनायक कोंडदेव ओक.

# अनुक्रमणिका.


| विषय. | पान. | नियम. |
| --- | --- | --- |
| १ वर्णविचार | १० | ४—१६ |
| संधिविचार | १३ | १७—२९ |
| २ शब्दविचार | १५ | ३०—३७ |
| नामविचार | १७ | ३८—४१ |
| लिंगविचार | १८ | ४२—४४ |
| वचनविचार | २० | ४५—५२ |
| विभक्तिविचार | २२ | ५३—५८ |
| सर्वनामविचार | २६ | ५९—६७ |
| विशेषणविचार | ३० | ६८—७४ |
| क्रियापदविचार | ३२ | ७५—८१ |
| भेद | ३४ | ८४—८७ |
| अर्थ | ३५ | ८८—९२ |
| काल | ३६ | ९४—१०० |
| प्रयोग | ३९ | १०२—१०५ |
| धातूंवरून क्रियापदांचीं रूपें | ४० | १०६—१०९ |
| अव्ययविचार | ४६ | ११२—१२३ |
| सामासिकशब्दविचार | ५१ | १२४—१३६ |
| ३ वाक्यविचार | ५५ | १३७—१४५ |
| कारकविचार | ५६ | १४६— |
| प्रयोग | ५८ | १४७—१५६ |
| पदानुक्रम | ६० | १५७—१७३ |
| अलंकार | ६४ | १७४—१९६ |
| विरामचिन्हें | ६७ | १९७—२०७ |
| लेखनशुद्धि | ६९ | |
| व्याकरण लावणें | ७० | |
| व्याकरण विशेष द्योतक वाक्यें | ७५ | |
| पद्यांतील शब्दांच्या विशेष रूपांविषयीं. | ७७ | |

# व्याकरणाचीं मूलतत्त्वें.

१. एका अक्षराला किंवा अनेक अक्षरांना कांहीं अर्थ असल्यास त्या एका अक्षराला किंवा अनेक अक्षरांला **शब्द** ह्मणतात. जसें:—तूं, रू, पी, ये, माती, गोडी इ०.

टीप—डिगो हा शब्द नव्हे. कारण यांना कांहीं अर्थ नाहीं.

## पाठ १ ला.

### नाम.

**झाड** हा शब्द एका दिसणाऱ्या वस्तूचें नांव आहे. ह्याप्रमाणें घर, आंबा, बैल, इ० वस्तूंचीं नांवें आहेत.

**पंतोजी** हें विद्या शिकविणाराचें नांव आहे. ह्याप्रमाणें वैद्य, वकील, सोनार, सुतार इ० नांवें होत.

त्याला **राग** आला—यांत **राग** हें मनाच्या विकाराचें नांव आहे. लोभ, दुःख, भय इ० शब्द याच प्रकारचीं नांवें आहेत.

**उजेड** पडला—यांत **उजेड** हें एका अवस्थेचें नांव आहे. याप्रमाणें उणीव, भरभराट, भपका, इ० नांवें होत.

मी **प्रश्न** विचारितों—यांत **प्रश्न** हा शब्द मी जें करितों त्या गोष्टीचें नांव आहे. याचप्रमाणें, पळ, लढाई, मारामार, करणें, जाणें इ० शब्द नांवें जाणावीं. ह्याप्रमाणें—

जे शब्द कशाचीं तरी नांवें असतात त्यांस व्याकरणांत **नामें** असें ह्मणतात.

### अभ्यास.

दहा प्रकारचीं झाडें, पांच नद्या, सहा निरनिराळे गांव, आठ जातींचे प्राणी, शरीराचे अवयव, आणि बाजारांतील कांहीं वस्तु यांचीं नांवें सांगा.

हुकूम, काळजी, पैज, भय, आळस, यश, पुर्ण, पाऊस, रामा, त्रास, मनाई, गारठा, आवेश, आशा, ह्या शब्दांस व्याकरणांत नामें कां ह्मणतात?

त्याला वेळ झाला. तंटा करूं नये. भांड्याखालीं जाळ कर. तुला मनाई कोण करील? तुमची भरभराट होईल. त्याचा उद्देश चांगला आहे. माझा बेत फसला. सांवर गोठ्यांत गेलें आणि गवताच्या गंजींत दडून राहिलें. वाड्याचा धनी तेथें आला. त्यानें चाकराला हाक मारिली. तिचा आनंद पोटांत माईना. ऊन चांगलें पडलें. मला त्याची गरज नाहीं. त्याला तहान लागली. ह्या गोष्टीचें कारण काय बरें? त्याची हयगय झाली. आतां उपाय काय? ह्या वाक्यांतलीं नामें सांगा.

## पाठ २ रा.

### सर्वनाम.

**मी** घोडा आणिला **तो** चांगला आहे—यांत बोलणारा आपल्या नांवाबद्दल **मी** हा शब्द योजितो आणि घोडा, हें नाम पुनः न यावें ह्मणून **तो** हा शब्द योजितो.

**तूं जें** पुस्तक पाहिलें **तें** माझें—यांत बोलणारा ज्या मनुष्याजवळ बोलतो त्याच्या नांवाबद्दल तूं शब्दाची योजना करितो. आणि पुस्तक पुस्तक असें दोन वेळ एकच नाम येऊन घोंटाळा पडूं नये ह्मणून **जें** या शब्दाची योजना करितो. तसेंच पुनः **तें** हा शब्द पुस्तक ह्या नामाबद्दल योजितो.

**मी, तूं, तो, जें, तें** इ० शब्द ह्मटल्यानें कांहींच स्पष्ट कळत नाहीं. परंतु हे शब्द ज्या नामांबद्दल योजितात त्या नामांचा ते बोध करितात. आणखीं पाहिजे-

त्या ह्मणजे सर्व नामांबद्दल यांची योजना करितात, ह्मणून ह्या शब्दांना सर्वनामें ह्मणतात. यावरून—

**सर्वनाम** ह्मणजे वाक्यांत नामाबद्दल येऊन त्या नामाचा बोध करणारा शब्द. जसें:–मी, तूं, तो, हा, जो, कोण, काय, कोणी.

## पाठ ३ रा.

### विशेषण.

तो मुलगा **काळा** आहे—यांत **काळा** शब्दानें मुलगा कसा आहे हें कळतें. ह्मणजे मुलगा ह्या नामाचा गुण समजतो.

तो **हिंदुस्थानी** भाषा बोलतो—यांत पुष्कळ भाषा, त्यांतील अमुक भाषा हें **हिंदुस्थानी** ह्या शब्दानें समजतें.

त्यानें **दोन** आंबे आणिले—यांत किती आंबे किंवा अमुक आंबे असा बोध **दोन** ह्या शब्दानें होतो.

ह्याप्रमाणें नामवाचक शब्द कोणत्या प्रकारच्या पदार्थांचें नांव आहे हें दाखविणारा शब्द त्या नामाची विशेष ओळख करून देतो. ह्मणून अशा शब्दाला व्याकरणांत विशेषण ह्मणतात. यावरून—

**विशेषण** ह्मणजे नामाचा गुण, किंवा प्रकार, किंवा संख्या दाखविणारा शब्द.

### अभ्यास.

तो घोडा **सडसडीत**, **चपळ** व **सुंदर** आहे. ह्या वाक्यांत घोडा ह्या नामाचीं तीन विशेषणें आहेत.

याप्रमाणें, मुलगा, शिपाई आणि राजा ह्या नामांला तीन, तीन विशेषणें लावा.

तिखट, उंच, चेंगट, चपटा, खारट, हुशार, दांडगा,

रोडका, इंग्रजी, दाट, पातळ, जुनें, महाग, पिवळें, खोल, कडक, अफाट, नामी, गार, मंद, पोकळ, तांबडा, घोकींव, तिकोनी, अवघड, मंजूळ, लहान, कमी, हीं विशेषणें अनुक्रमें—भाजी, झाड, मुलगा, आकार, रुचि, कारकून, माणूस, बैल, विद्या, वस्ती, माया, मत, दाणा, वस्त्र, विचार, थंडी, मैदान, युक्ति, वारा, बुद्धि, डौल, शेला, उत्तर, रुमाल, जागा, नाद, गांव, योग्यता इ० नामांला लावा.

मन, आवाज, निरोप, कसब, ढोंग, खेळ, कपट, नाश, थट्टा, उमेद, रस्ता, खर्च, हवा, काम, रंग, प्रधान, अर्थ, झोंप, उद्योग, गर्व, हांसें, साडी, माडी इ० नामांला विशेषणें लावा.

## पाठ ४ था.

### क्रियापद.

रामा **जातो**—यांत बोलणारा रामा काय करितो हें **जातो** ह्या शब्दानें सांगतो.

भात **शिजला**—ह्यांत बोलणारा **शिजला** ह्या शब्दानें भाताची स्थिति सांगतो.

फळ **पडलें**, फळ **नासलें**, फळ **पिकतें**. येथें बोलणारा फळाची स्थिति तीन शब्दांनीं सांगतो.

मुलगा **खेळतो**, मुलगा **निजला**, मुलगा **गेला** इ० येथें बोलणारानें 'मुलगा' ह्या नामाविषयीं तीन शब्दांनीं सांगितलें आहे. ह्याप्रमाणें—

बोलणारा एकाद्या नामवाचक शब्दाविषयीं ज्या शब्दानें सांगतो त्यास **क्रियापद** ह्मणतात.

क्रियापदाची क्रिया कालाच्या संबंधानें घडते. जसें :—

 ग्रा.०२१-३८

**जातो**—चालू काळांत जाण्याची क्रिया करितो. **जाईल**—पुढील काळांत जाण्याची क्रिया करील. **गेला**—मागील काळांत जाण्याची क्रिया केली. तसेंच क्रिया घडण्याचे निरनिराळे प्रकार असतात. जसें:—तूं **जा** यांत आज्ञा, त्वां **जावें** यांत धर्म, तो **जाता** तर यांत संकेत इ०. ह्या प्रकारास अर्थ ह्मणतात. यावरून——

**क्रियापद** ह्मणजे ज्या शब्दावरून क्रियेच्या स्थितीचा बोध होऊन काल व अर्थ यांचाही बोध होतो तो शब्द.

टीप—बोलणारा ज्या नामवाचक शब्दाविषयीं सांगतो तो नामवाचक शब्द क्रिया करणारा असतो. ह्मणजें त्या क्रियापदाचा कर्ता असतो. जसें:–हरि धांवतो. यांत बोलणारा हरीविषयीं धांवतो ह्या शब्दानें सांगतो. ह्मणजे हरि काय क्रिया करितो हें धांवतो ह्या शब्दावरून समजतें. ह्मणून धांवतो हें क्रियापद व धांवतो ह्याची क्रिया करणारा हरि हा धांवतो ह्या क्रियापदाचा कर्ता. यावरून—

**कर्ता** ह्मणजे वाक्यांत जो शब्द क्रिया करणारा असतो तो. जसें:—**विठू** उठला, **गंगा** भिते. यांत—विठू व गंगा हे अनुक्रमें उठला व भिते ह्या क्रियापदांचे कर्ते होत.

टीप—क्रियापदाला "कोण" असा प्रश्न करून जें उत्तर येतें तो कर्ता. जसें:–मेंढी बसली. यांत बसली ह्या क्रियापदाला "कोण बसली" असा प्रश्न केला असतां मेंढी हें उत्तर येतें. ह्मणून मेंढी हा बसली ह्या क्रियापदाचा कर्ता.

टीप—कित्येक क्रियापदाच्या क्रियेचें फळ भोगणारा नामवाचक शब्द असतो. जसें:–गोविंदा गाईला बांधितो–ह्या वाक्यांत बांधितो ह्या क्रियापदाचें फळ भोगणारा **गाईला** हा नामवाचक शब्द आहे. अशा शब्दाला क्रियापदाचें **कर्म** ह्मणतात. यावरून **कर्म** ह्मणजे क्रियापदाच्या क्रियेचें फळ भोगणारा शब्द. क्रियापदाला "काय" प्रश्न करून जें उत्तर निघतें तें त्या क्रियापदाचें कर्म होय. परंतु रामा मुलगा आहे. येथें काय आहे असा प्रश्न केल्यानें मुलगा हें उत्तर येतें असें वाटतें; परंतु तें कर्म नव्हे. कारण रामा व मुलगा हीं एकाच वस्तूचीं नांवें आहेत.

### अभ्यास.

मुलगा **खेळेल**, मुलगा **लिहील**, मुलगा **वाचील**. यांत मुलगा काय करितो हें तीन निरनिराळ्या शब्दांनीं सांगितलें. याचप्रमाणें वासरूं, पक्षी, मासा, ह्यांबद्दल सांगा. धांवतो, बसेल, उठतील, पडलें, खेळले, निजला, जा, यावें, जावें, ये, भितो, भी, आला, आहे, होता, झाला, नव्हता, चरत्ये ह्या क्रियापदांला कर्ते घाला.

हरि लिहितो, विठू वाचील, रामानें दिलें, गणूनें बांधिलें, वाघ पकडतो, पक्षी नेईल, गुडी आणील, मुलानें घेतलें, पक्षी प्याला, सदू, धू, शिवा, दे, मुलानें शिकावें, राजानें द्यावें, तो करता तर, भिमी शिवती तर इ० वाक्यांतल्या क्रियापदांला कर्म घाला.

पुढील वाक्यांत कर्ता, कर्म व क्रियापद ओळखा. रामानें कालच गाडी विकली, तूं ती पाहिली काय? मीं ती पेटींत ठेविली आहे. मामानें चितूला दोन मातीचीं चित्रें दिलीं. हरीनें आई जवळ पैसे मागितले. दादा, माझी लोटी कोठें आहे? आई मला झोंप येते. विहिरींत बेडूक उड्या मारितात. माप नीट भर. मुलानें नित्य अभ्यास करावा. मजुरानें मोठा खाडा खणिला. तुला ह्याचें मोल मिळालें. त्यानें त्याला छडी मारिली. त्यानें त्याला मारिलें. गंगू दूध काढित्ये इ०.

## पाठ ५ वा.

### अव्ययें.

नामास **आंबा** किं. **आंबे** किं. **आंब्यास** इ० विकार होतात, याच प्रमाणें विशेषण, सर्वनाम ह्यांस विकार होतात. व क्रियापदास **जातो** किं: **जात्ये** किं. **जातात** इ० विकार

होतात. ह्याप्रमाणें हळू, काल, येथें, इ० शब्दांस विकार होत नाहींत ह्मणून ह्यांस अविकारी अ० अव्ययें ह्मणतात. ह्या विकारास लिंग किं० वचन इ० यांचा विकार ह्मणतात. हें पुढें कळेल. यावरून—

**अव्ययं** ह्मणजे ज्या शब्दास बहुतकरून लिंग, वचन इ० यांचा विकार होत नाहीं तो शब्द.

रामा **हळू** जातो. यांत **हळू** ह्या शब्दानें जातो ह्या क्रियापदाचा प्रकार समजतो. ह्मणजे कसा किंवा कोणत्या प्रकारें जातो असें समजतें.

तो **तेथें** बसला. यांत **तेथें** ह्या शब्दावरून बसण्याची क्रिया कोठें घडली हें समजतें.

तो **काल** गेला. यांत जाण्याची क्रिया केव्हां घडली हें **काल** ह्या शब्दावरून कळतें. ह्याप्रमाणें—

ज्या शब्दावरून क्रिया कशी, केव्हां किंवा कोठें घडली असा बोध होतो त्याला **क्रियाविशेषण** ह्मणावें.

टीप १—केव्हां क्रिया घडली असा बोध करणाऱ्या विशेषणास कालवाचक क्रियाविशेषण ह्मणतात. तीं—आज, पर्वा, उद्यां, नेहमीं, जेव्हां, केव्हां, तों, तेव्हां इ०. तो दुसऱ्या दिवशीं गेला यांत जाण्याची क्रिया केव्हां घडली हें दिवशीं ह्या शब्दानें समजतें, परंतु तो शब्द क्रियाविशेषण नाहीं. कारण दिवस हें नाम आहे.

टीप २—कोठें क्रिया घडली हें दाखविणाऱ्या क्रियाविशेषणाला स्थलवाचक क्रियाविशेषण ह्मणतात. तीं—येथें, जेथें, मागें, पुढें, खालीं, लांब, दूर, समोर इ०. तो बागेंत गेला. यांत जाण्याची क्रिया कोठें घडली हें बागेंत ह्या शब्दावरून समजतें, परंतु बाग हा शब्द नाम आहे. ह्मणून तें क्रियाविशेषण नव्हे.

टीप ३—क्रिया कशी घडली हें दाखविणारीं—हळू, जलद, निमूट इ०.

### अभ्यास.

फुकट, खुशाल, साफ, गच्च, उघड, परत, सहज, ठार, एकत्र, नुकता, आतां, पार, रगडून, भराभर, टपटपां,

मुद्दाम, जवळ, रोज, कधीं, समूळ, तिसऱ्यानें इ० क्रियाविशेषणें पुढील क्रियापदांला अनुक्रमें लावा.—गेला, बसला, लिहिलें, धरील, बोलतो, आला, केलें, मारील, रहा, पडला, येईल, गेला, भरलें, चालला, गाळिलें, आला, नाहीं, काढितो, सांगतो, येशील? फसला, केलें इ०.

पुढील वाक्यांतील क्रियाविशेषणें सांगा.

तो उठला नाहीं तोंच मी तेथें पोंहचलों. तो फार जलद चालतो. लवकर काम आटोप. शिपाई मागें हटले. परंतु पुनः पुढें झाले. रामानें पोथी चांगली वाचिली. तुह्मी कोठें असतां? आंत जा. बाहेर जाऊं नको. कदाचित् मला तुझें काम पडेल. तो मुद्दाम तेथें उभा राहिला. कसें केलें हो हें! जलदी कर इ०.

## पाठ ६ वा.

रामा **आणि** गोविंदा शाळेंत गेले: येथें "रामा शाळेंत गेला, गोविंदा शाळेंत गेला" हीं दोन वाक्यें **आणि** ह्या शब्दानें जोडिलीं.

तो श्रीमंत आहे, **परंतु** कृपण दिसतो. येथें **परंतु** यानें "तो श्रीमंत आहे, कृपण दिसतो" हीं वाक्यें जोडून त्यांपैकीं एक दुसऱ्याच्या उलट आहे असें दाखविलें.

तो येथें असेल **किंवा** गांवीं गेला असेल. येथें **किंवा** यानें "तो येथें असेल, गांवीं गेला असेल" हीं दोन वाक्यें जोडून त्यांपैकीं कोणतें तरी एक खरें असें दाखविलें.

तो आला **तर** मी जाईन. येथें **तर** यानें "तो आला, मी जाईन" हीं दोन वाक्यें जोडून त्यांपैकीं एक दुसऱ्यावर अवलंबून आहे असें दाखविलें.

तो माझा शेजारी आहे **ह्मणून** मी त्याला ओळखितों.

येथें **ह्मणून** यानें जोडलेल्या दोन वाक्यांपैकीं पाहिलें दुसऱ्याचें कारण आहे असें दाखविलें. ह्याप्रमाणें—

दोन वाक्यें जोडणारे ह्मणजे दोन वाक्यांचा अन्वय करणारे शब्द ह्यांस उभयान्वयी ह्मणतात. यावरून—

जो शब्द दोन शब्द अथवा दोन वाक्यें यांचा अन्वय करितो त्यास **उभयान्वयी** ह्मणावें.

टीप—रामा चालतो तसा गोविंदा चालतो. यांत तसा हें चालतो ह्या क्रियापदाचें क्रियाविशेषण आहे. उभयान्वयी नाहीं.

## पाठ ७ वा.

पक्षी झाड**वर** बसला. यांत **वर** हा शब्द झाड ह्या नामाला लागून त्याचा संबंध बसला ह्या शब्दाकडे दाखवितो. व याच्या योगानें झाड याचें " झाडा ".असें सामान्यरूपही होतें.

ह्याप्रमाणें नामवाचक शब्दाला लागून त्याचें सामान्यरूप करणाऱ्या व त्या नामाचा संबंध पुढच्या शब्दाकडे दाखविणाऱ्या शब्दाला **शब्दयोगी** ह्मणतात. जसें:— खालीं, वर, पुढें, मागें समोर, कडून, मुळें, करितां, साठीं, पेक्षां, पाशीं, मध्यें, विषयीं इ०.

टीप—मुला जोगी मुलगी आहे. यांत जोगी हें मुलगी ह्या नामाचें विशेषण आहे. ह्मणून तें शब्दयोगी अव्यय नाहीं.

## पाठ ८ वा.

**अरेरे**, असें झालें कांय? यांत **अरेरे** ह्यानें बोलणाराच्या मनाला झालेलें दुःख कळतें.

**वाहवा!** काय मौज ही! येथें **वाहवा** यानें मनाला आनंद झाला हें प्रकट होतें. ह्याप्रमाणें—

मनाचे विकार दाखविणारें तें **केवलप्रयोगी** होय.

टीप—यांचा वाक्यांतील दुसऱ्या कोणत्याच शब्दाकडे संबंध नसतो.

# व्याकरणसार.

१. **भाषा** ह्मणजे परस्परांचें मनोगत बोलून अथवा लिहून कळविण्याचें साधन.

२. ज्यांत भाषेंतील शब्दांची व्युत्पत्ति व त्यांचा परस्परांशीं संबंध सांगितला असतो त्यास **व्याकरण** ह्मणतात.

टीप—व्युत्पत्ति ह्मणजे शब्द कसा तयार झाला हें सांगणें.

३. व्याकरणाचे मुख्य भाग तीन आहेत. **वर्णविचार, शब्दविचार** आणि **वाक्यरचना.**

## १ वर्णविचार.

४. ज्यांत वर्णांचे ह्मणजे भाषेंतील मूळ ध्वनींचे उच्चार, त्यांचीं स्थानें आणि संधि यांचा विचार सांगितला असतो त्याला **वर्णविचार** ह्मणतात.

५. वर्ण अठ्ठेचाळीस आहेत. त्यांत **स्वर** आणि **व्यंजनें** असे दोन भेद आहेत.

६. ज्या वर्णाचा उच्चार स्वतंत्रपणें पूर्ण होतो त्या वर्णास **स्वर** ह्मणतात.

७. ज्या वर्णाचा उच्चार स्वराच्या साह्यावांचून पूर्ण होत नाहीं त्याला **व्यंजन** ह्मणतात.

८. अ पासून **औ** पर्यंत स्वर चौदा आहेत. त्यांत **अ, इ, उ, ऋ, ऌ,** हे ऱ्हस्व स्वर आणि **आ, ई, ऊ, ॠ, ॡ, ए, ऐ, ओ, औ** हे दीर्घ स्वर.

टीप—ए, ऐ, ओ, औ ह्यांस संयुक्त स्वरही ह्मणतात.

९. स्वर उच्चारण्यास जो काळ लागतो त्यास **मात्रा** ह्मणतात. ऱ्हस्व स्वराची एक मात्रा व दीर्घ स्वराच्या दोन मात्रा मानितात.

१०. क् पासून ळ् पर्यंत व्यंजनें चौतीस आहेत. यांचा उच्चार पूर्ण होत नाहीं. ह्मणून तीं क् च् त् ट् अशीं लिहितात. यांत क् पासून म् पर्यंत जीं व्यंजनें आहेत त्यांचे पांच वर्ग केले आहेत; ते—क् ख् ग् घ् ङ् हा कवर्ग; च् छ् ज् झ् ञ् हा चवर्ग; ट् ठ् ड् ढ् ण् हा टवर्ग; त् थ् द् ध् न् हा तवर्ग आणि प् फ् ब् भ् म् हा पवर्ग. बाकी राहिलेलीं व्यंजनें—य् र् ल् व् श् ष् स् ह् ळ् यांचे वर्ग केलेले नाहींत.

११. प्रत्येक स्वर अक्षर आहे. आणि व्यंजनांत स्वर मिळविला ह्मणजे अक्षर होतें. जसें:—क्+अ=क. क्+ई=की इ०.

१२. व्यंजनांत स्वर मिळवितांना त्यांचीं जीं रूपें होतात तीं देऊन बाराखडी कशी होतें तें दाखवितों.

अ आ इ ई उ ऊ ऋ ॠ ऌ ॡ ए ऐ ओ औ—स्वर.
ा ि ी ु ू ृ ॄ ॢ ॣ े ै ो ौ—रूपें.
ग गा गि गी गु गू गृ गॄ गॢ गॣ गे गै गो गौ—अक्षरें.

टीप—ह्याशिवाय ज्या अक्षराचा उच्चार नाकांत होतो त्यावर टिम्ब देतात त्यास अनुस्वार ह्मणतात. आणि ज्या अक्षराच्या उच्चाराबरोबरच हकारासारखा उच्चार थोडा नेट देऊन करावा लागतो त्यापुढें (ः) दोन टिम्बें देतात त्यास विसर्ग ह्मणतात. यांस कोणी स्वरांत लेखितात.

१३. एकाहून अधिक व्यंजनें व स्वर जोडून जें अक्षर होतें त्यास जोडाक्षर ह्मणतात. जसें:—ह्+य्+अ=ह्य. स्+व्+अ=स्व इ०.

टीप १—क्+ष्+अ=क्ष आणि ज्+ञ्+अ=ज्ञ. हीं जोडाक्षरें त्यांच्या मूळाक्षरांच्या आकाराहून भिन्न दिसतात.

टीप २—र् हें दुसऱ्या अक्षरास जोडतांना ( ॅ किंवा ्र ) असें जोडतात. जसें:— र्+क=र्क. र्+या=ऱ्या इ०.

टीप ३—र या अक्षराला कोणतेंही व्यंजन जोडतांना र्‍चें ( ^ ) असें रूप होतें. जसें:-क्+र=क्र. प्+र=प्र. ड्+र=ड्र इ०.

टीप ४—श् हें व, र, न, च आणि ल ह्या अक्षरांस जोडतांना कधीं (श्‍) असें होतें. जसें:-श्+व=श्व. श्र, श्न, श्च, श्ल इ०.

टीप ५—ज्या व्यंजनांला स्वाभाविक काना आहे तें दुसऱ्या अक्षरांचा जोडतांना बहुधा त्याचा काना जातो. जसें-म्य ; त्म इ०.

टीप ६—इतर व्यंजनें तशींच लिहून त्यांच्या पुढें किंवा खालीं प्रघाताप्रमाणें दुसरें अक्षर जोडावें. जसें:-द्द, द्व, ड्य, इ०.

१४. मुखांत वर्णाचा उच्चार जेथून होतो तें त्या वर्णाचें **स्थान** होय. हीं स्थानें येथें सांगतों.

अ, आ, कवर्ग आणि ह् यांचें **कंठस्थान.**

इ, ई, चवर्ग आणि य्, श्, यांचें **तालुस्थान.**

उ, ऊ, पवर्ग यांचें **ओष्ठस्थान.**

ऋ, ॠ, टवर्ग आणि र्, ष्, ळ्, यांचें **मूर्द्धस्थान.**

ऌ, ॡ, तवर्ग आणि ल् स्, यांचें **दंतस्थान.**

ए, ऐ, यांचें **कंठतालुस्थान.**

ओ, औ, यांचें **कंठौष्ठस्थान.**

व्, याचें **दंतौष्ठस्थान.**

ङ्, ञ्, ण्, न्, म्, यांना त्यांच्या वर्गाचें स्थान असून **नासिकास्थान**ही आहे.

१५. प्रत्येक वर्गांतील पहिलीं दोन दोन व्यंजनें आणि श्, ष्, स्, मिळून तेरा व्यंजनें **कठोर** होत. बाकी सर्व व्यंजनें व स्वर हे **मृदुवर्ण** होत.

१६. शब्दांत ज्या अक्षरावर अनुस्वार असतो त्याचा उच्चार त्यापुढील वर्ण ज्या वर्गांतील असेल त्या वर्गांतील अनुनासिकाप्रमाणें होतो. जसें:—पंडित ( पण्डित ), चंद्र ( चन्द्र ) इ०.

टीप १—परंतु अनुस्वारयुक्त अक्षरापुढें र्, व्, श्, ष्, स्, ह्, आणि ज्ञ ह्यांपैकीं व्यंजन असतां अनुस्वाराच्या उच्चारांत व् ह्या व्यंजनाचा उच्चार होतो. जसें:- संरक्षण; संवाद; संशय; संसार; सिंह; संज्ञा इ०.

टीप २—सानुस्वार अक्षरापुढें य्, ल्, व्, हे वर्ण असले तर त्या अनुस्वाराच्या उच्चारांत ह्या वर्णांचाही उच्चार होतो. जसें:-संयोग ( संय्योग ), संलग्न ( संल्लग्न ), संवाद ( संव्वाद ). इ०.

टीप ३—परंतु मराठी शब्दांत अनुस्वाराचा उच्चार केवळ नाकांत होतो. तेथें १६ व. नियम लागत नाहीं. जसें-कांटा; कांहीं इ०.

## संधिविचार.

१७. एका शब्दाचा अंत्य वर्ण व दुसऱ्या शब्दाचा आद्य वर्ण एकांत एक मिळतात त्यास **संधि** ह्मणतात.

१८. दोन स्वरांचा संधि होतो त्यास **स्वरसंधि** ह्मणतात. व दोन व्यंजनांचा अथवा स्वर आणि व्यंजन यांचा संधि होतो त्यास **व्यंजनसंधि** ह्मणतात.

१९. संयुक्त स्वरांखेरीज एक जातीचे स्वर एकत्र आले तर त्या दोहोंबद्दल त्यांचा **दीर्घ** स्वर होतो. जसें—**नर+अधम=नराधम. हरि+इच्छा=हरीच्छा. साधु+उक्ति=साधूक्ति. पितृ ( बाप ) ऋण ( कर्ज ) पितॄण.**

टीप—ऱ्हस्व स्वर व त्याचा दीर्घ स्वर हे परस्पर सजातीय होत.

२०. अ किंवा **आ** यांच्या पुढें इ, उ, ऋ, लृ (ऱ्हस्व अ० दीर्घ ) आले असतां. त्यांचा संधि अनुक्रमें **ए, ओ, अर्, अल्,** असा होतो. जसें:—**देव+ईश्वर=देवेश्वर. व्यास+उक्ति=व्यासोक्ति. लेख+ऋषि=लेखर्षि.**

२१. अ किंवा **आ** यांपुढें **ए ऐ** अ० **ओ. औ** आले तर त्यांचा संधि **ऐ** किंवा **औ** होतो. जसें:—**नृप+ऐश्वर्य=नृपैश्वर्य. गुण+एक=गुणैक. कथा+ओघ=कथौघ इ०.**

टीप १—जेथें दोन स्वरांबद्दल पुढचा स्वर होतो तेथें **पररूपसंधि** ह्मणतात. कर+ऊन=करून, वाण+एं=वाणा+एं=वाणें इ०.

टीप २—जेथें दोन स्वरांबद्दल पुढचा स्वर होतो तेथें पूर्वरूपसंधि ह्मणतात. जसें जातो+आहे=जातोहे, करितो+असा=करितोसा. विहीर+आंत=विहिरी+आंत=विहिरींत. घर+आंत=घरा+आंत=घरांत इ०.

२२. इ, उ, ऋ, ऌ, ( ऱ्हस्व अ० दीर्घ ) यांच्या पुढें विजातिय स्वर आला तर त्यांचीं रूपें अनुक्रमें **य्, व्, र्, ल्,** होऊन त्यांत पुढील स्वर मिळतो. जसें:—**इति+अर्थ=इत्यर्थ. अति+उत्तम=अत्युत्तम. गुरु+आज्ञा=गुर्वाज्ञा. मातृ+आज्ञा=मात्राज्ञा. ऌ+अनुबन्ध=लनुबन्ध** इ०.

२३. **ए, ऐ, ओ** आणि **औ,** यांच्या पुढें विजातीय स्वर आला असतां त्यांचीं रूपें अनुक्रमें **अय्, आय्, अव्** आणि **आव्** अशीं होऊन त्यांत पुढील स्वर मिळतो. जसें:—**ने+अन=नयन. गै+अक=गायक. गो+ईश्वर=गवीश्वर. नौ+इक=नाविक** इ०.

२४. **क्, च्, ट्, त्, प्,** ह्या कठोर व्यंजनांपैकीं कोणत्याही व्यंजनापुढें मृदु व्यंजन अ० स्वर आला असतां त्या कठोर व्यंजनाबद्दल त्याच्याच वर्गांतलें तिसरें अक्षर येतें. जसें:—**मत्+वचन=मद्वचन. वाक्+जाल=वाग्जाल** इ०.

२५. **क्, च्, ट्, त्, प्,** ह्या कठोर व्यंजनांपुढें अनुनासिक व्यंजन आलें तर त्या कठोर व्यंजनाच्या जागीं त्याच्या वर्गांतील अनुनासिक व्यंजन विकल्पानें येतें. जसें:—**मत्+मन=मन्मन. वाक्+मन=वाङ्मन. षट्+मास=षण्मास.** ( यांचे संधि—**मद्मन, वाग्मन, षड्मास** असेही होतात ).

२६. विसर्गापूर्वी **अ** स्वर असून पुढें **अ** किंवा मृदु

व्यंजन आलें तर विसर्गाचा **ओ** होतो. जसें:—**अधः+मुख=अधोमुख. पयः+अन्वित=पयोऽन्वित** इ०.

**२७.** विसर्गापूर्वीं **अ** किंवा **आ** शिवाय स्वर असून पुढें मृदु व्यंजन आलें तर विसर्गाचा **र्** होतो. जसें:—**बहिः+देश=बहिर्देश. निः+मळ=निर्मळ** इ०.

**२८.** **र्**कारान्त शब्दापुढें कठोर व्यंजन आलें तर **र्**चा विसर्ग होतो. जसें:—**अंतर्+करण=अंतःकरण** इ०.

**२९.** **त**वर्गांतील व्यंजना पुढें **च**वर्गांतील व्यंजन, **ट**वर्गांतील व्यंजन, **ल्** किंवा **श्** आल्यास पहिल्याबद्दल पुढील व्यंजन येतें. जसें:—**सत्+चरित=सच्चरित. तत्+टीका=तट्टीका. मत्+ललाट=मल्ललाट** इ०.

टीप—नासिक्य शिवाय करून कोणत्याही वर्गीय अक्षरापुढें श् आल्यास त्यास विकल्पें छ् होतो. जसें:-तत्+शिव=तच्छिव, अ० तच्शिव. सत्+शास्त्र=सच्छास्त्र, सच्शास्त्र.

---

## २. शब्दविचार.

**३०.** एक किंवा अनेक अक्षरांपासून कांहीं अर्थ उत्पन्न झाला ह्मणजे त्याला **शब्द** ह्मणावें. जसें:—धी; कीं; यें; माती इ०.

**३१.** शब्दाचे मुख्य भेद तीन आहेत:—**प्रातिपदिकें, क्रियापदें** आणि **अव्ययें.**

**३२.** प्रातिपदिकांत **नाम, सर्वनाम** आणि **विशेषण** असे तीन भेद आहेत. प्रातिपदिकांसच **नामवाचक शब्द** ह्मणतात.

**३३.** **नाम** ह्मणजे; दिसणाऱ्या वस्तूचें किंवा इंद्रियांला

समजणाऱ्या वस्तूचें किंवा एखाद्या गोष्टीचें नांव. जसें:-झाड, गोडी, वाद इ०.

३४. **सर्वनाम** ह्मणजे जो शब्द वाक्यांत नामाबद्दल योजितात व जेणेंकरून त्या नामाचा बोध होतो तें. जसें:-मी, तूं, तो, हा, जो, कोण, काय इ०.

३५. जो शब्द नामाचा गुण दाखवितो व त्याचा अर्थ मर्यादित करितो त्या शब्दास **विशेषण** ह्मणावें. जसें:-उंच, ठेंगणा, रुंद, मोठा इ०.

टीप—विशेषण हें, सर्वनामाप्रमाणें नामाच्या ऐवजीं योजितात. परंतु तें त्या नामाचा बोध करून आणखी त्याचा गुणही दाखवितें. विशेषणें हीं क्रियाविशेषणें होतात, तशीं सर्वनामें क्रियाविशेषणें होत नाहींत. सर्वनामाच्या विभक्तिरूपाची साधनिका विशेषणाच्या विभक्तिरूपाच्या साधनिकेहून भिन्न आहे. सर्वनामाला स्वतंत्र अर्थ नाहीं.

३६. ज्या शब्दावरून काळाच्या संबंधानें क्रियेच्या स्थितीचें ज्ञान होऊन अर्थाचाही बोध होतो त्यास **क्रियापद** ह्मणावें. जसें:-करितो, करील, केलें, कर, करावें इ०.

टीप—अर्थ ह्मणजे क्रिया घडण्याचा प्रकार.

३७. ज्या शब्दाला बहुतकरून लिंग, वचन आणि विभक्ति लागत नाहींत, त्यास **अव्यय** ह्मणावें. जसें:-हळू, जलद, फार, आणि, परंतु, कीं, किंवा, खालीं, वर, इकडे, पुढें, मागें, तेथें, येथें इ०.

टीप—पदार्थ, गुण, अ० क्रिया यांची आवृत्ति, अनुवृत्ति किंवा तत्सजातीय पदार्थांचा समाहार दाखविण्याकरितां शब्दाची द्विरुक्ति करितात त्यास व्याप्ति ह्मणावें. व त्या शब्दास व्याप्त्यर्थ द्विरुक्त शब्द ह्मणावें. जसें-**थेंब थेंब** पाणी गळतें, त्याचे हाल हाल झाले इ० नामें. लांब लांब गोष्टी सांगतो, **थोडें थोडें** काम करितो इ० विशेषणें. खा खा खातो, बस बस बसतो इ० क्रियाविशेषणें.

टीप—भाऊ, भाऊ, साडू साडू, इ० परस्परसंबंधी नामें होत.

## ( अ ) नामविचार.

३८. नामांत **सामान्यनाम, विशेषनाम** आणि **भाववाचकनाम** असे तीन भेद आहेत. यांस **लिंग, वचन** आणि **विभक्ति** असतात.

३९. जें नाम एकाच जातीच्या वस्तूंपैकीं कोणत्याही वस्तूला एकाच अर्थानें लागतें त्या नामास **समान्यनाम** ह्मणावें. जसें:–घोडा, मुलगी, पर्वत, शहर इ०.

**विवरण—घोडा**, हें नाम त्या जातीचे जे प्राणी आहेत त्यांतील प्रत्येकास लावितां येईल. **मुलगी**, हें नांव कोणत्याही मुलीला लावितां येईल. **पर्वत**, हें नांव जमिनीवर जे मोठे उंचवटे आहेत त्यांतील प्रत्येकाला लावितां येईल. **शहर**, हें नांव ज्या स्थळीं मनुष्यांची मोठी वस्ती असेल त्या प्रत्येकास लागेल.

४०. **विशेषनाम** ह्मणजे एकाच व्यक्तीचें नांव. ह्मणजे मनुष्य, नदी, देश इत्यादिकांतील प्रत्येकास ओळखण्याकरितां ठेविलेलें नांव. जसें–काशी, नीलगिरि, पुणें, नर्मदा इ०.

**विवरण—काशी**, हें अमुकच मुलगी असें ओळखण्याकरितां ठेविलेलें नांव. **नीलगिरि**, अमुकच पर्वत असा बोध करणारें नांव. **पुणें**, पुष्कळ शहरांपैकीं अमुक शहर असा बोध करणारें नांव. **नर्मदा**, अमुक नदीचें नांव.

४१. **भाववाचक नाम** ह्मणजे पदार्थांतील साधारण गुणाचें निराळें मानिलेलें नांव. जसें:–मनुष्यपण, राग, शोभा इ०.

**विवरण—मनुष्यपण**, मनुष्याचा जो गुण त्याचें नांव. **राग**, मनाच्या धर्माचें नांव. **शोभा**, वस्तूच्या आंगच्या गुणांचें नांव.

(अ) भाववाचक नामें पुढें लिहिल्याप्रमाणें जाणावीं.

१ मनाच्या धर्मांचीं–लोभ, आवेश, दुःख, आनंद इ०.

२ पदार्थाच्या स्वरूपाचीं किंवा गुणाचीं—उजेड, काळोख, उणीव, ढब, गोडी, लांबी इ०.

३ **पण, गिरी, आई, वा, की,** ई प्रत्यय लागून भाववाचक नामें होतात. जसें:—देवपण, लुच्चेगिरी, धिटाई, थंडावा, पाटिलकी, लांबी इ०.

४ **त्व, ता** आणि **य** हे प्रत्यय लागून झालेलीं संस्कृत भाषेंतलीं भाववाचकनामें मराठींत आलीं आहेत तीं-मित्रत्व, रसिकता, शौर्य इ०.

**सूचना**—शब्दांच्या जातीच्या व्याख्या देऊन उदाहरणेंही दिलीं आहेत, ह्यावरून त्या त्या शब्दाच्या त्याच जाति असें समजूं नये. वाक्यांत त्या वारंवार बदलतात. हें व्याकरणविशेषद्योतक वाक्यांत स्पष्ट दाखविलें आहे.

## लिंगविचार.

**४२.** नामाच्या ठिकाणीं पुरुषत्वादि जो स्वाभाविक किंवा कल्पित धर्म असतो त्या धर्मास **लिंग** ह्मणतात.

हीं लिंगें तीन आहेत. **पुल्लिंग** ह्मणजे पुरुषजाति. **स्त्रीलिंग** ह्मणजे स्त्रीजाति आणि **नपुंसकलिंग** ह्मणजे पुरुषजाति नव्हे व स्त्रीजाति नव्हे अशी जाति. खूण—जें नाम **तो** ह्या सर्वनामानें दाखवितां येतें तें **पुल्लिंगी** जाणावें; जें नाम **ती** ह्या सर्वनामानें दाखवितां येतें तें नाम **स्त्रीलिंगी** जाणावें; जें नाम तें ह्या सर्वनामानें दाखवितां येतें त्याचें **नपुंसकलिंग** जाणावें.

टीप—परंतु ज्याची जन्मभाषा मराठी नाहीं त्यास ह्या खुणेचा उपयोग नाहीं. ह्मणून ही खूण खरी नव्हे.

(अ) कित्येक प्राणिवाचक पुल्लिंगी नामांला ईण प्रत्यय लागून त्यांचें स्त्रीलिंग होतें. जसें:—वाघ-वाघीण. सुतार-सुतारीण इ०.

(ब) आकारान्त प्राणिवाचक पुल्लिंगी नामें स्त्रीलिंगी ईकारान्त व नपुंसकलिंगी एंकारान्त होतात. जसें:—कुत्रा—कुत्री—कुत्रें. घोडा—घोडी—घोडें इ०.

टीप—आकार ह्मणजे आ, ईकार ह्मणजे ई, ऊकार ह्मणजे ऊ, असें जाणावें. तसेंच शब्दाच्या शेवटच्या स्वरास अंत्यस्वर व अंत्याक्षराच्या पूर्वींच्या अक्षरांतील स्वरास उपांत्य किं० उपांत्य स्वर ह्मणतात. जसें:-दार यांतील अंत्य अ व उपांत्य आ.

४३. कित्येक प्राणिवाचक नामांचीं पुल्लिंगी व स्त्रीलिंगी रूपें स्वतंत्र असतात. तीं:—

| पु० | स्त्री० | पु० | स्त्री० |
|---|---|---|---|
| मोर | लांडोर. | खोंड | कालवड. |
| वाघ्या | मुरळी. | उंट | सांड. |
| दादा (मानाचें) | ताई. | राजा | राणी. |
| बावा (मानाचें) | बाई. | रेडा | हैस. |
| बोका | भाटी. | नर | मादी. |
| बोकड | शेळी. | इ०. | इ०. |

कित्येक नामें देशपरत्वें भिन्नलिंगी मानितात तीं :—

| पु० | स्त्री० | न० | पु० | स्त्री० | न० |
|---|---|---|---|---|---|
| आस्वल | आस्वल, | आस्वल. | तमाखू | तमाखू | ० |
| गाढव | ० | गाढव. | जागा | जागा | ० |
| बाग | बाग | ० | इ०. | इ०. | |

टीप—मूल, पोर इ० नामें तिन्ही लिंगी आहेत.

४४. कित्येक वस्तु मोठ्या असल्या ह्मणजे पुल्लिंगी, आणि लहान असल्या ह्मणजे स्त्रीलिंगी मानितात. जसें:—

| पु० | स्त्री० | पु० | स्त्री० | पु० | स्त्री० |
|---|---|---|---|---|---|
| गोटा | गोटी. | शिंपला | शिंपली. | हिरा | हिरकणी. |
| सोटा | काठी. | नद | नदी. | डोंगर | टेंकडी. |

## वचनविचार.

४५. पदार्थांचें एकत्व किंवा अनेकत्व यांस अनुसरून जें नामाचें रूप असतें त्यास वचन ह्मणतात.

४६. ज्या नामाची संख्या एक असते त्याचें **एकवचन.** जसें:—घोडा, बैल, पान इ०.

४७. ज्या नामाची संख्या एकाहून अधिक असते त्याचें **अनेकवचन.** जसें:—घोडे, पानें इ०.

(अ) एकाद्याला बहुमानानें हाक मारावयाची असतां एकवचनी नामाचा अनेकवचनाप्रमाणें प्रयोग करितात. जसें:—बाबा, तात्या, माधवराव इ०.

(आ) भाववाचकनामें, विशेषनामें, प्रवाहीपदार्थांचीं नामें आणि सोनें, मीठ इ० कांहीं द्रव्यवाचकनामें यांस अनेकवचन नाहीं परंतु अशा नामांचें अनेकत्व कल्पिलें तर अनेकवचन होतें. जसें:—दोन्ही **गोपाळ** आले, त्याला चवी फार आठवतात इ०.

(इ) कांहीं शब्द नेहमीं अनेकवचनीच असतात. जसें:—हाल, देवी ( पुळ्यांचा रोग ), डोहळे इ०.

(ई) कांहीं शब्द अर्थाप्रमाणें एकवचनीच किंवा एकवचनी व अनेकवचनी असतात जसें:—

| फक्त एकवचन. | ए० व० | अ० व० |
|---|---|---|
| दाणा ( धान्य ) | दाणा ( शेंगेंतला ) | दाणे. |
| पैसा ( द्रव्य ) | पैसा ( दिडकी ) | पैसे. |
| इ०. | इ०. | इ०. |

टीप—समुदाय किंवा जमाव या अर्थी अनेकवचनाबद्दल एकवचन योजितात. जसें:—एक लाख मनुष्य जमलें, पांचशें पात्र झालें इ०.

४८. **अ-ई-ऊ-ओ**-कारान्त पुल्लिंगी नामांचीं एकवचनी व अनेकवचनी रूपें सारखींच असतात. जसें:—

| पु० अंत | ए० व० | अ० व० | पु० अंत | ए० व० | अ० व० |
|---|---|---|---|---|---|
| ,, अ | वाघ | वाघ. | ,, ऊ | लाडू | लाडू. |
| ,, ई | तेली | तेली. | ,, ओ | टाहो | टाहो. |

४९. इ-ई-उ-ऊ-कारान्त तिन्ही लिंगी संस्कृत नामांचीं एकवचनी आणि अनेकवचनी रूपें सारखीं असतात.

| लिंग | अंत | ए०व० | अ०व० | लिंग | अंत | ए०व० | अ०व० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पु० | इ | अग्नि | अग्नि. | स्त्री० | ई | श्रीमती | श्रीमती. |
| ,, | ई | शास्त्री | शास्त्री. | ,, | उ | धेनु | धेनु. |
| ,, | उ | शत्रु | शत्रु. | ,, | ऊ | वधू | वधू. |
| ,, | ऊ | स्वयंभू | स्वयंभू. | नपुं० | इ | अस्थि | अस्थि. |
| स्त्री० | इ | भीति | भीति. | ,, | उ | मधु | मधु. |

५०. नामांचें उपांत्याक्षर दीर्घ ई-ऊकारान्त असलें तर अनेकवचनीं तें ऱ्हस्व होतें. व कोठें कोठें अकारान्त होतें. जसें:—जीभ-जिभा, सूत-सुतें, माणूस-माणसें इ०.

अपवाद—बुरूड, परीट इ० पुल्लिंगीं नामें व सूत्र, रूप इ० संस्कृत नामांच्या रूपांत बदल होत नाहीं.

५१. नामाचा उपांत्य ई किंवा ऊ स्वर असेल तर अनेकवचनीं तो ऱ्हस्व होतो. किंवा त्याच्या जागीं अनुक्रमें य किंवा व आदेश होतो. जसें:—ताईत-ताइतीं किंवा तायती. कऊल-कउलें किंवा कवलें.

टीप—आदेश ह्मणजे एक वर्णाबद्दल दुसरा वर्ण होणें व आगम ह्मणजे शब्दांत अधिक वर्ण येणें.

५२. ज्या नामांचीं अनेकवचनें होतांना त्यांच्या अंत्याला विकार होतात त्यांचीं उदाहरणें खालीं देतों.

## पुल्लिंग.

| अन्त. | ए०व० | विकार | अ०व० | अन्त. | ए०व० | वि० | अ०व० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | आंबा | ए | आंबे. | आ | भाला | ए | भाले. |

## स्त्रीलिंग.

| अंत | ए० व० | विकार | अ० व० | अंत | ए०व० | विकार | अ० व० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | भिंत | ई | भिंती. | ई | चुलती | या | चुलत्या. |
| ,, | वेळ | आ | वेळा. | ,, | राई | ,, | रांया. |
| ,, | परात | आ | पराता. | ,, | बी | इया | बिया. |
| | | ई | पराती. | | | | |
| ऊ | सू | उया | सुया. | ए | सवे | अया | सवया. |
| ऊ | सासू | वा | सास्वा. | ऐ | पै | अया | पया. |
| ,, | ऊ | ,, | उवा. | ओ | बायको | आ | बायका. |
| ,, | जाऊ | ,, | जावा. | इ० | इ० | इ० | इ०. |

## नपुंसकलिंग.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | फूल | एं | फुलें. | ऊं | कोंकरूं | एं | कोकरें. |
| ई | बीं | इंयें | बियें. | ,, | तारूं | वें-अवें | तावें-तारवें. |
| ,, | मोतीं | यें | मोत्यें. | एं | तळें | ईं | तळीं. |

## विभक्तिविचार.

५३. नामवाचकशब्दाला प्रत्ययं लागून क्रियापदाशीं किंवा नामवाचकाशीं संबंध दाखविणारें जें त्याचें रूप होतें त्याला **विभक्ति** ह्मणतात. व त्या प्रत्ययाला **विभक्तिप्रत्यय** ह्मणतात.

५४. ह्या विभक्ति सात आहेत त्या व त्यांचे प्रत्यय खालीं लिहिल्याप्रमाणें जाणावे.

## विभक्तिप्रत्यय.

| | ए० व० | अ० व० |
|---|---|---|
| प्रथमा | शब्दाचें मूळ रूप. | शब्दाचें अने० व० रूप. |
| तृतीया | नें, एं,* शीं | नीं, हीं, ईं,* शीं. |

| | ए० व० | अ० व० |
|---|---|---|
| चतुर्थी | स; ला, तें* | स, ला, ना तें.* |
| पंचमी | ऊन, हून | ऊन, हून. |
| षष्ठी | चा | चा. |
| सप्तमी | ई* आं* | ई* आं.* |

संबोधन ( नामाचें सामान्यरूप ) नों.

टीप १—कोणी नामाला "आंत" शब्दयोगी लागून पूर्वरूपसंधि होतो तेथें सप्तमी मानितात. जसें:-वाग+आंत=वागे + आंत = वागेंत इ०.

टीप २—ज्या प्रत्ययांवर फुली आहे त्यांचा उपयोग गद्यांत विशेष होत नाहीं. पद्यांत फार होतो. भाषेंत चरणरचना असते तिला **पद्य** व बोलण्याच्या भाषेस गद्य ह्मणतात.

टीप ३—"स, ला, तें" हे प्रत्यय द्वितीयेचेही मानितात. परंतु विभक्ति कारकावरून मानिल्यास घोटाळा होतो ह्मणून त्या प्रत्ययावरूनच मानिल्या पाहिजेत, आणि द्वितीयेचें कार्य चतुर्थीनें व प्रथमेनें होतें ह्मणून तिला निराळी मानण्याचें कारण नाहीं.

टीप ४—"चा" प्रत्यय लागलेलीं नामें विशेषणासारखीं वाटतात खरीं, तथापि **रात्रीचा** जागतो, **कानाचा** धड यांत **रात्रीचा** व **कानाचा** हीं विशेषणें आहेतच असें ह्मणतां येत नाहीं. तसेंच ह्या प्रत्ययाचा दुसऱ्या शब्दाशीं संबंध असतो, तो कारकाप्रमाणें असतो. असा विशेषणाचा संबंध नसतो. दुसरें ह्या प्रत्ययानें नामाचें सामान्यरूप होतें. त्याप्रमाणें प्रत्यय लागून झालेल्या विशेषणाचें उदाहरण मराठींत देतां येत नाहीं. आणखी समासाच्या विग्रहाच्या वेळीं षष्ठीची आवश्यकता असते. ती ह्याच प्रत्ययानें दूर होते. ह्मणून पुढील नामाच्या लिंगवचनांप्रमाणें ह्या प्रत्ययाला विकार होतो हा एक विशेष मानून हा षष्ठीचा प्रत्यय मानावा हें ठीक दिसतें.

८८. विभक्तिप्रत्यय नामाला लागतांना नामाचें जें रूप सिद्ध होतें त्याला **सामान्यरूप** ह्मणतात. जसें:—**वाघास** यांतील "स" प्रत्यय काढिला ह्मणजे **वाघा** असें रूप राहतें हेंच **सामान्यरूप** होय.

टीप—स्वरादि प्रत्यय लागतांना नामाचें सामान्यरूप होऊन नंतर पररूपसंधि होतो. जसें:-घर+ऊन=घरा+ऊन=घरून. पाय+ई=पाया+ई=पायीं इ०.

५६. नामांचीं सामान्यरूपें होतांना त्यांत कसे फेरफार होतात हें सांगतों. व सर्वांस चतुर्थीचा प्रत्यय लावून दाखवितों.

## पुल्लिंग.

| अंत | नाम ए० व | सा०रू० | उदाहरण | अ०व० सा०रू० | उदाहरण. |
|---|---|---|---|---|---|
| अ | वाघ | आ | वाघास | आं | वाघांस. |
| आ | घोडा | या | घोड्यास | या | घोड्यांस. |
| आ | चहा | आ | चहास | आं | चहांस. |
| इ | रवि | ई | रवीस | ई | रवींस. |
| ई | तेली | या | तेल्यास | यां | तेल्यांस. |
| उ | भानु | ऊ | भानूस | ऊं | भानूंस. |
| ऊ | काडू | अवा | काडवास | अवां | काडवांस. |
| | | ऊ | काडूस | ऊं | काडूंस. |
| ऊ | तट्टू | आ | तट्टास | आं | तट्टांस. |
| ,, | खाऊ | ऊ | खाऊस | ऊं | खाऊंस. |
| ओ | टाहो | ओ | टाहोस | ओं | टाहोंस. |

## स्त्रीलिंग.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ | भिंत | ई | भिंतीस | ई | भिंतींस. |
| ,, | वहाण | ए | वहाणेस | आं | वहाणांस. |
| ,, | वरात | ई–ए | वरातीस, | ई | वरातींस. |
| | | | वरातेस | आं | वरातांस. |
| आ | जागा | ए | जागेस | आं | जागांस. |
| ,, | रमा | आ-ए | रमास, रमेस | आं | रमांस. |
| इ | रुचि | ई | रुचीस | ई | रुचींस. |

| अंत | नाम | ए. व. सा. रू. | उदाह. | अ. व. सा. रू. | उदाह. |
|---|---|---|---|---|---|
| ई | काठी | ई | काठीस | यां | काठ्यांस. |
| ,, | बी. | इये | बियेस | इयां | बियांस. |
| | | ई | बीस | यां | ब्यांस. |
| उ | धेनु | ऊ | धेनूस | ऊं | धेनूंस. |
| ऊ | सासू | वे | सास्वेस | वां | सास्वांस. |
| | | ऊ | सासूस | ऊं | सासूंस. |
| ,, | सू | उई | सुईस | उयां | सुयांस. |
| ए | सवे | अई | सवईस | अयां | सवयांस. |
| ऐ | पै | अई-ऐ | पईस-पैस | अयां | पयांस. |
| ओ | बायको | ओ | बायकोस | आं | बायकांस. |

## नपुंसकलिंग.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ | पान | आ | पानास | आं | पानांस. |
| इ | अस्थि | ई | अस्थीस | ई | अस्थींस. |
| ई | मोती | या | मोत्यास | यां | मोत्यांस. |
| उ | मधु | ऊ | मधूस | ऊं | मधूंस. |
| ऊं | कोंकरूं | आ | कोंकरास | आं | कोंकरांस. |
| ,, | तारूं | वा | तार्वास | वां | तार्वांस. |
| | | अवा | तारवास | अवां | तारवांस. |
| एं | भांडें | या | भांड्यास | यां | भांड्यांस. |

५७. वरील सर्व नामांच्या सामान्यरूपाला चतुर्थी लावून दाखविली. याचप्रमाणें इतर विभक्ति लागतात. हा प्रकार घर शब्दाला सर्व विभक्ति लावून दाखवितों त्यावरून समजेल.

| विभक्ति | ए० व० | अ० व० |
|---|---|---|
| प्रथमा | घर. | घरें. |
| तृतीया | घरानें, घराशीं. | घरांनीं, घरांशीं. |
| चतुर्थी | घरास, घराला. | घरांस, घरांला, घरांना |
| पंचमी | घरून, घराहून. | घरून, घरांहून. |
| षष्ठी | घराचा इ०. | घरांचा इ०. |
| सप्तमी | घरीं, घरां. | घरीं, घरां. |
| संबोधन | घरा. | घरांनो. |

५८. आकारान्त प्रतिष्ठावाचकनामें, टोपणनामें, आ, ई, ऊकारान्त विशेषनामें, व ओकारान्त पुल्लिंग नामें यांना सामान्यरूप होतांना कांहीं विकार होत नाहींत. व ज्या नामवाचकाचें शेवटचें अक्षर चा, जा, सा दंत्य असतें त्यांचा उच्चार चा, जा, शा असा तालव्य होतो.

## सर्वनामविचार.

५९. सर्वनामाचे पांच भेद आहेत—**पुरुष**, **दर्शक**, **संबंधी**, **प्रश्नार्थक** आणि **सामान्य**.

६०. बोलणारे परस्परांच्या नांवाबद्दल व ज्याविषयीं बोलतात त्याच्या नांवाबद्दल जीं सर्वनामें योजितात तीं **पुरुषसर्वनामें** होत.

६१. बोलणारा आपल्या नांवाबद्दल जें सर्वनाम योजितो तें **प्रथमपुरुषसर्वनाम**. जसें:—**मी**. बोलणारा ज्यापाशीं बोलतो त्याच्या नांवाबद्दल जें सर्वनाम योजितो तें **द्वितीयपुरुषसर्वनाम**. जसें:—**तूं**. आणि ज्याविषयीं बोलणारा बोलतो त्याच्या नांवाबद्दल येणारें सर्वनाम तें **तृतीयपुरुषसर्वनाम**. याबद्दल **तो**, **ती**, **तें** इ० दर्शकसर्वनामांची योजना करितात. **आपण** हें सर्व पुरुषीं योजितात.

६२. जें सर्वनाम जवळचा अथवा दूरचा पदार्थ दाखवितें त्यास **दर्शकसर्वनाम** ह्मणावें. जसें:—**हा** घोडा व **तो** घोडा—यांत **हा** यानें, घोडा हा जवळचा पदार्थ दाखविला व **तो** यानें घोडा हा दूरचा पदार्थ दाखविला.

टीप—असा, इतका, एवढा, तसा, तितका, तेवढा इ० ह्यांस **दर्शकसर्वनामें** ह्मणतात. परंतु हीं विशेषणें आहेत.

६३. जें सर्वनाम दर्शकसर्वनामाशीं संबंध ठेवितें तें **संबंधीसर्वनाम** होय. जसें:—**जो** घोडा पाहिला तो हा. यांत **जो** याचा संबंध **तो** ह्या दर्शकसर्वनामाकडे आहे.

टीप—जितका, जेवढा इ० विशेषणांला कोणी संबंधीसर्वनामें ह्मणतात.

६४. जें सर्वनाम प्रश्न करावयाचा असतां योजितात त्यास **प्रश्नार्थकसर्वनाम** ह्मणावें. जसें:—तो **कोण** आहे? तें **काय** आहे? इ०.

टीप—किती, केवढा इ० विशेषणांलाही कोणी प्रश्नार्थक सर्वनामें ह्मणतात.

६५. ज्या सर्वनामाचा उपयोग सामान्येंकरून होतो त्यास **सामान्यसर्वनाम** ह्मणावें. जसें:—कोण, कोणी इ०.

टीप—कांहीं, सर्व, अमका, इ० विशेषणांला कोणी सामान्यसर्वनामें मानितात.

६६. सर्वनामाला लिंग, वचन आणि विभक्ति असतात:—त्यांत मी, तूं, आपण, कोण, काय हीं तिन्ही लिंगीं समान आहेत. आणि तो, हा, जो यांचें स्त्रीलिंग अनुक्रमें ती, ही, जी व नपुंसकलिंग तें, हें, जें होय.

६७. ह्या सर्वनामांला विभक्ति लावून दाखवितों.

**मी.**

| विभक्ति. | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| प्रथमा | मी. | आह्मी. |

| विभक्ति. | ए० व०. | अ० व०. |
|---|---|---|
| तृ० | म्यां, मीं, मजशीं, मशीं. | आह्मीं, आह्मांशीं. |
| चतु० | मला, मजला, मातें. | आह्मांस, आह्मांला, आह्मांतें. |
| पंच० | मजहून. | आह्मांहून. |
| षष्ठी | माझा. | आमचा. |

## तूं.

| | | |
|---|---|---|
| प्र० | तूं. | तुह्मी. |
| तृती० | तूं, त्वां, तुशीं, तुजशीं. | तुह्मीं, तुह्मांशीं. |
| चतु० | तुला, तुजला, तुतें. | तुह्मांस, तुह्मांला, तुह्मांतें. |
| पंच० | तुजहून. | तुह्मांहून. |
| षष्ठी | तुझा. | तुमचा. |

## आपण.

| | | |
|---|---|---|
| प्रथ० | आपण. | आपण. |
| तृती० | आपण, आपणाशीं. | आपण, आपणांशीं. |
| च० | आपणास, आपणाला. | आपणांस, आपणांला. |
| पं० | आपणाहून. | आपणांहून. |
| षष्ठी | आपला. | आपला. |

## कोण.

| | | |
|---|---|---|
| प्रथ० | कोण. | कोण. |
| तृ० | कोणीं, कोणाशीं. | कोणीं, कोणांशीं. |
| च० | कोणाला. | कोणांला. |
| पंच० | कोणाहून. | कोणांहून. |
| षष्ठी | कोणाचा. | कोणांचा. |

## काय.

| | | |
|---|---|---|
| प्रथ० | काय. | काय. |
| तृ० | कशानें—कशाशीं. | कशांनीं—कशांशीं. |

| विभक्ति. | ए० व०. | अ० व०. |
|---|---|---|
| च० | कशास–कशाला. | कशांस–कशांना. |
| पं० | कशाहून. | कशांहून. |
| षष्ठी | कशाचा. | कशांचा. |

### तो.

| | | |
|---|---|---|
| प्रथ० | तो. | ते. |
| तृ० | त्यानें–शीं, त्याजशीं. | त्यांनीं–शीं. |
| च० | त्यास–ला–तें, त्याजला. | त्यांस–ला–ना, त्यांजला. |
| पंच० | त्याहून, त्याजहून. | त्यांहून, त्यांजहून. |
| षष्ठी | त्याचा. | त्यांचा. |

### ती.

| | | |
|---|---|---|
| प्रथ० | ती. | त्या. |
| तृ० | तिनें, तिशीं, तिजशीं. | त्यांनीं, त्यांशीं, त्यांजशीं. |
| च० | तीस, तिला, तिजला. | त्यांना, त्यांजला. |
| पंच० | तीहून, तिजहून. | त्यांहून, त्यांजहून. |
| षष्ठी | तिचा. | त्यांचा. |

### तें.

| | | |
|---|---|---|
| प्र० | तें. | तीं. |

टीप—तें शब्दाचीं प्रथमेशिवाय सर्व विभक्तींचीं रूपें तो शब्दाप्रमाणें आहेत.

### हा.

| | | |
|---|---|---|
| प्र० | हा. | हे. |
| तृ० | ह्यानें, ह्याशीं, ह्याजशीं.<br>यानें, याशीं, याजशीं. | ह्यांनीं, ह्यांहीं, ह्यांजशीं.<br>यांनीं, यांहीं, यांजशीं. |
| च० | ह्यास, ह्याला, यास, याला. | ह्यांस, ह्यांला, ह्यांना.<br>यांस, यांला, यांना. |

| विभक्ति. | ए० व०. | अ० व०. |
|---|---|---|
| पं० | ह्याहून, ह्याजहून, याहून, याजहून. | ह्यांहून, ह्यांजहून. यांहून, यांजहून. |
| ष० | ह्याचा, याचा. | ह्यांचा, यांचा. |

ही.

| | | |
|---|---|---|
| प्र० | ही. | ह्या. |
| तृ० | हिनें, हिशीं. इनें, इशीं. | ह्यांनीं, ह्यांहीं, ह्यांशीं. यांनीं, यांहीं, यांशीं. |
| पं० | हिजहून, हीहून. इजहून. | ह्यांहून, ह्यांजहून. यांजहून. |
| ष० | हिचा, इचा. | ह्यांचा, यांचा. |

हें.

| | | |
|---|---|---|
| प्र० | हें. | हीं. |

बाकीच्या विभक्तींचीं रूपें "हा" शब्दाप्रमाणें होतात.

## विशेषणविचार.

६८. विशेषणाचे **गुणविशेषण** आणि **संख्याविशेषण** असे दोन भेद आहेत.

६९. नामाचा गुण किंवा स्वरूप दाखवून त्याचा अर्थ संकुचित करणाऱ्या शब्दाला **गुणविशेषण** ह्मणावें. जसें:— काळा, तांबडा, लांब, उंच, चांगला इ०.

असा, असला, तसा, तसला इ० **दर्शक** अ० **प्रकारार्थक** विशेषणें; जसा, जसला इ० **संबंधी** विशेषणें; कसा, कसला इ० **प्रश्नार्थक** विशेषणें; सारखा, जोगा, योग्य इ० **तुलनार्थक** विशेषणें—हीं दोन नामांची तुलना दाखवितात व ज्या नामाशीं तुलना असते त्या नामाच्या सामान्यरूपास लागून पुढील नामाचा अर्थ संकुचित करितात. जसें:—

**माणसासारखें** माणूस, **तुझयायोग्य** असा मी इ०.—करित, करणारा, केलेलें इ० **धातुसाधित** विशेषणें, तसेंच पदार्थाचा अतिशयपणा अ० इतर वस्तूची व्यावृत्ति दाखविण्याकरितां शब्दास चा, चे, च्या किं० च प्रत्यय लागून **अतिशयार्थक** किं० **व्यावृत्त्यर्थक** विशेषणें होतात. जसें:—**आपल्या** आपण, **गालच्या** गालीं इ० व्यावृत्त्यर्थक आणि, **विघेच्या** विघे, **पैसेच** पैसे इ० **अतिशयार्थक** विशेषणें इ० गुण-विशेषणाचे भेद मानितां येतात.

७०. जें विशेषण नामाची संख्या दाखवितें तें **संख्या-विशेषण** होय. जसें:—**चार** आंबे, **पहिला** मुलगा इ०.

७१. **संख्यांशवाचक, क्रमवाचक, आवृत्तिवाचक, अनियमितसंख्यावाचक, प्रमाणार्थक** व **परस्परसंबंधी** असे संख्याविशेषणाचे सहा भेद आहेत.

**संख्यांशवाचक**—संख्येचे अंश दाखविणारें. जसें:—दीड, साडे तीन इ०. **क्रमवाचक**—संख्येचा क्रम दाख-विणारें. जसें:—पहिला, दुसरा इ०. **आवृत्तिवाचक**—संख्येची आवृत्ति ह्मणजे पट दाखविणारें. जसें:—दुप्पट, तिप्पट इ०. **अनियमितसंख्यावाचक**—नामाची अमुक संख्या असें न दाखविणारें. जसें:—पुष्कळ, थोडें इ०. **प्रमा-णार्थक**—पदार्थाचें प्रमाण दाखविणारें. जसें—इतका, एवढा, तितका, तेवढा इ०. **परस्परसंबंधी**—एकाव्यक्तीचा दुसऱ्या व्यक्तीशीं संबंध दाखविणारीं. जसें—एकमेक, परस्पर इ०.

७२. विशेषण ज्या नामाचा गुण दाखवितें तें नाम त्या विशेषणाचें **विशेष्य** होय. जसें:—शहाणा **मुलगा**, यांत शहाणा ह्या विशेषणाचें **मुलगा** हें विशेष्य होय.

७३. आकारान्त पुल्लिंगी विशेषणाचा अंत्य विशेष्याच्या

लिंगवचनांप्रमाणें बदलतो. जसें:-**शहाणा** मुलगा, **शहाणी** मुलगी, **शहाणें** मूल; **शहाणे** मुलगे, इ०.

टीप १—जर विशेष्यास विभक्ति लागली तर ह्या विशेषणास "या किंवा ए" आदेश होतो. जसें:-शहाण्या किंवा शहाणे पुरुषास, शहाण्या किंवा शहाणे बायकोस इ०.

टीप २—संबंधीसर्वनामें व दर्शकसर्वनामें ह्यांसही हा आदेश होतो. ह्या विशेष्यविकाराला सामान्यरूपच ह्मणण्याचा प्रघात आहे.

**७४.** विशेषणांस विभक्ति लाविली तर त्यांचीं सामान्यरूपें नामाप्रमाणेंच होतात. जसें:-पु० चांगला—चांगल्यास. स्त्री० चांगली—चांगलीस. न० चांगलें—चांगल्यास. इ०.

टीप—दोन, तीन, चार ह्यांची सामान्यरूपें दोहों, तिहीं, चोहों अशीं होतात. व हींच विशेषणें प्राणिवाचक असलीं ह्मणजे विकल्पें दोघां, तिघां, चौघां अशीं सामान्यरूपें होतात.

## क्रियापदविचार.

**७५.** क्रियापदाचें **अकर्मक** आणि **सकर्मक** असे दोन मुख्य भेद आहेत.

**७६.** ज्या क्रियापदाला कर्ता व कर्म असतें तें **सकर्मक.**

**७७.** ज्या क्रियापदाला कर्ता मात्र असतो, परंतु कर्म नसतें तें **अकर्मक.**

**७८.** ज्या नामवाचक शब्दापासून क्रियेचा व्यापार निघतो, ह्मणजे जो क्रिया करणारा असतो, तो क्रियापदाचा **कर्ता.** जसें:-**रामा** बसतो. यांत **रामा** हा बसण्याची क्रिया करितो. ह्मणून तो बसतो ह्या क्रियापदाचा **कर्ता.**

**७९.** जो नामवाचक शब्द क्रियेचें फळ भोगणारा असतो तो त्या क्रियापदाचें **कर्म** होय. जसें:-हरि **गाय** बांधितो. यांत बांधणें ह्या क्रियेचें फळ भोगणारा **गाय** हा नामवाचक शब्द, बांधितो ह्या क्रियापदाचें **कर्म** आहे.

टीप—दे, मार, बोल, म्हण, सांग इ० धातूंवरून होणाऱ्या क्रियापदांला दोन कर्में असतात. जसें:-मी त्याला पैसे देतों. त्यांनीं त्याला चाबूक मारिला, तो रामाला हें ह्मणाला—बोलला इ०.

८०. कित्येक क्रियापदांचा कर्ता निराळा नसतो, क्रियापदांच्या रूपांतच असतो, त्यांस **अकर्तृक क्रियापदें** ह्मणतात. जसें:—उजाडतें ह्म० उजेड होतो, सांजावतें—सांज होते, कळमळतें—कळमळ करते इ०.

टीप—जीं क्रियापदें भाषेंत सकर्मकरीतीनें योजिलेलीं आढळतात तीं नेहमीं सकर्मकच असतात असा नियम नाहीं. प्रसंगविशेषीं तींच अकर्मकही योजलेलीं आढळतील. जसें:—

| सकर्मक. | अकर्मक. |
|---|---|
| ती काम करिते. | मला कळमळ करते. |
| ते दोऱ्या वळतात. | माझे पाय वळतात. |
| तो चित्र पाहतो. | तो चित्राकडे पाहतो. |

८१. ज्या शब्दांला प्रत्यय लागून क्रियापदें होतात, त्या शब्दांला **धातु** ह्मणतात. व त्या प्रत्ययांना **आख्यात-प्रत्यय** ह्मणतात. जसें:—जा, ये, ऊठ, कर इ० हे **धातु.** आणि तो, तात, ला, ईल इ० हे **आख्यातप्रत्यय** होत.

टीप १—नाम व विशेषण यांस आळ किंवा आव प्रत्यय लागून स्वार्थी-धातु होतात. जसें:-रागावणें, माणसाळणें, वेडावणें, पिसाळणें इ०.

टीप २—कधीं कधीं नाम किंवा विशेषण यांचा धातूप्रमाणें प्रयोग करितात. तेही स्वार्थीधातु जाणावे. जसें:-मोहरणें, संतोषणें इ०.

८२. क्रियापदाला **रूप, भेद, अर्थ, काळ, लिंग, पुरुष, वचन** आणि **प्रयोग** हीं असतात.

८३. क्रियापद, **होय** या अर्थीं ह्म० विधिदर्शक असतां त्याचें **करणरूप** आणि **नाहीं** या अर्थीं ह्म० निषेधार्थी असतां त्याचें **अकरणरूप** जाणावें. जसें:—**करणरूप**—होतों; केलें; करावें; दे इ०. **अकरणरूप**—नव्हतों; केलें नाहीं; करूं नये; देऊं नको इ०.

८४. मूळ धातूला कांहीं विकार होऊन अथवा कांहीं प्रत्यय लागून, त्याला निराळें रूप प्राप्त होतें व अर्थांतही कांहीं विशेष होतो, त्याला **भेद** ह्मणावें. हे भेद तीन आहेत. **मूळरूपभेद, प्रयोजकभेद** आणि **शक्यभेद.**

८५. मूळ धातूवरूनच जें क्रियापद होतें तें **मूळरूपभेदी** क्रियापद होय. जसें:—करितों, केलें, करीन इ०.

८६. मूळ धातूस "**ईव** अ० **वी**" प्रत्यय लागून त्याच्याठायीं प्रयोजनेचा म्हणजे दुसऱ्याकडून क्रिया करविण्याचा अर्थ उत्पन्न होऊन जीं क्रियापदें होतात, त्यांस **प्रयोजकभेदी** क्रियापदें म्हणावीं. जसें:—करवितों; करवीन; करविलें; खेळिवतों; खेळिवलें इ०.

टीप १—एकाक्षरी धातूला "विव" प्रत्यय लागून हीं क्रियापदें होतात. दे-देविवतो, ने-नेवविलें इ०.

टीप २—कालवितो, आटवितो इ० यांत प्रयोजनेचा अर्थ नाहीं ह्मणून तीं प्रयोजकभेदी क्रियापदें नव्हत.

टीप ३—कित्येक मूळ धातूंचें पहिलें अक्षर अ-इ-उकारान्त असतें तें अनुक्रमें आ-ए-ओ-कारान्त होऊन प्रयोजक क्रियापदें होतात. जसें:—

मू० भे०—पडतो, गळतो, फिटतो, सुटतो इ०.
प्रयो० भे०—पाडतो, गाळतो, फेडतो, सोडतो इ०.

टीप ४—तसेंच मूळ धातूंत ट आणि त अ० प असेल तर कधीं कधीं टचा ड आणि त अ० प यांचा व होतो. जसें:—

मू० भे०—तुटतो, गुंततो, रुपतो, इ०.
प्र० भे०—तोडतो, गोंवतो, रोंवतो इ०.

टीप ५—प्रयोजकभेदी क्रियापदें नेहमी सकर्मक असतात, कारण अकर्मक धातूंवरून प्रयोजक क्रियापदें होतांना मूळचा कर्ता कर्मस्थानीं येऊन, क्रिया करविणारा तो कर्ता होतो. जसें:—दोरी तुटते ( मू. भे. ). तो दोरी तोडितो ( प्र. भे. ). आणि सकर्मक धातूवरून प्रयोजक क्रियापद केलें तर मूळचें कर्म काईम राहतें. परंतु कर्त्याला कडून अ० करवीं हें अव्यय लागून क्रिया करणारा तो कर्ता होतो. जसें:—रामा काम करितो ( मू. भे. ). तो रामाकडून काम करवितो ( प्र. भे. ).

८७. अनेकाक्षरी धातूला **व** आणि एकाक्षरी धातूला **वव** हे प्रत्यय लागून त्यांच्याठायीं शक्तीचा अर्थ उत्पन्न होतो. म्हणजे त्या धातूवरून होणाऱ्या क्रियापदाचा कर्ता क्रिया करण्याला समर्थ आहे असा अर्थ होतो. ह्यांना **शक्यभेदी** अ० **शक्य क्रियापदें** म्हणतात. जसें:– करवतें; देववतें इ०.

टीप—सांजावतें जाणवतें, इ० क्रियापदांत शक्तीचा अर्थ नाहीं. ह्मणून हीं मूळरूपभेदीच जाणावीं.

८८. क्रिया घडण्याचे निरनिराळे प्रकार क्रियापदांच्या रूपांवरून कळतात, त्यांस **अर्थ** म्हणतात. हे अर्थ चार आहेत. **स्वार्थ, आज्ञार्थ, विध्यर्थ** आणि **संकेतार्थ.**

८९. ज्या क्रियापदाच्या रूपावरून अमुक गोष्ट आहे किंवा नाहीं एवढाच अर्थ समजतो, त्यास **स्वार्थी क्रियापद** म्हणतात. जसें:–तो जातो, येईल, वाचील, नाहीं इ०.

९०. क्रियापदांच्या रूपांवरून आज्ञा, उपदेश, प्रार्थना, इच्छा, प्रश्न इ० अर्थ उत्पन्न होतात तेव्हां तीं **आज्ञार्थी** क्रियापदें जाणावीं. जसें:–रामा **जा** ( आज्ञा ). मुलांनो, खोटें **बोलूं नका** ( उपदेश ). पंतोजी, मला रजा **द्या** ( प्रार्थना ). ईश्वर तुमचें कल्याण **करो** ( इच्छा ). मी **जाऊं**? ( प्रश्न ) इ०.

९१. क्रियापदांच्या रूपांवरून धर्म, शक्यता, योग्यता, संभव, मोकळीक इ० अर्थ उत्पन्न होतात, तेव्हां तीं क्रियापदें **विध्यर्थी** जाणावीं. जसें:–आईची आज्ञा **पाळावी** ( धर्म ). त्यानेंच घोड्यावर **बसावें** ( योग्यता ). आज पाऊस **पडावा** ( संभव ). त्यानें पाहिजे तर **जावें** ( मोकळीक ). तुम्हीं मला **बोलावें** ( शक्यता ). इ०.

**९२.** क्रियेची अनिष्पत्ति असून जेव्हां क्रियापदाच्या रूपावरून एक क्रियापद दुसऱ्या क्रियापदावर अवलंबून आहे असा अर्थ उत्पन्न होतो, तेव्हां तें क्रियापद **संकेतार्थी** जाणावें. जसें:–तो **जाता** तर ठीक. मी **येतों** तर बरें झालें **असतें.**

**९३. अस** व याचें अकरणरूप **नस** ह्यांना **साहाय्य धातु** म्हणावें. कारण ह्यांचीं क्रियापदें इतर धातूं वरून झालेल्या धातुसाधितांला लाविलीं असतां संयुक्त काळ होतात.

**९४.** क्रियापदाच्या रूपावरून ती क्रिया केव्हां घडणारी आहे हें समजतें त्याला **काळ** ह्मणावें. हे काळ तीन आहेत. **वर्तमान, भूत** आणि **भविष्य.**

**९५.** ज्या क्रियापदाच्या रूपावरून चालू काळांत क्रिया घडते असें समजतें, त्याचा **वर्तमानकाळ** जाणावा. जसें:–करितो, देतात, चालतें इ०.

**९६.** ज्या क्रियापदाच्या रूपावरून मागील काळांत क्रिया घडली असें समजतें, त्याचा **भूतकाळ** जाणावा. जसें:–केलें, दिली, चाललें इ०.

**९७.** जें क्रियापद क्रिया पुढील काळांत घडणार असें दाखवितें, त्याचा **भविष्यकाळ** जाणावा. जसें:– करीन, चालेल, देईल इ०.

**९८.** आतां तिन्ही भेदी क्रियापदांचीं शुद्धरूपें देतों.

| मूळरूपभेद. | प्रयोजकभेद. | शक्यभेद. | काळ. |
|---|---|---|---|
| तो करितो. | तो करवितो. | त्याच्यानें करवतें. | वर्तमान. |
| त्यानें केलें. | त्यानें करविलें. | त्याच्यानें करवलें. | भूत. |
| तो करी. | तो करवी. | त्याच्यानें करवे. | रीतिभूत. |

| | | | |
|---|---|---|---|
| तो करील. | तो करवील. | त्याच्यानें करवेल. | भविष्य. |
| तो करणार. | तो करविणार. | त्याच्यानें करवणार. | |
| तो करो. | तो करवो. | त्याच्यानें करवो. | आज्ञार्थ. |
| त्यानें करावें. | त्यानें करवावें. | ०. | विध्यर्थ. |
| त्यानें करावयाचें. | करवावयाचें. | ०. | |
| तो करता. | तो करविता. | त्याला करवता. | संकेतार्थ. |

टीप–आज्ञार्थ, विध्यर्थ, आणि संकेतार्थ यांच्या रूपांखेरीज बाकीचीं स्वार्थी रूपें जाणावीं.

९९. धातूला कांहीं प्रत्यय लागून मूळरूपभेदी नामें, विशेषणें व अव्ययें होतात तीं:—

| प्रत्यय. | रूपें. | जाति. |
|---|---|---|
| णें. | करणें*, जाणें*. | क्रियावाचक नामें. |
| इत-त. | करित-जात | वर्तमानकालवाचक विशेषणें. |
| ता. | करता, जाता. | कर्तृवाचक विशेषणें. |
| तां-तांना. | कारितां, करतांना. | वर्तमानकालवाचक अव्ययें. |
| ला-लेला. | केला, केलेला. | भूतकालवाचक विशेषणें. |
| ऊन. | करून, जाऊन. | भूतकालवाचक अव्ययें. |
| णार, णारा. | करणार*, करणारा. | भविष्यकालवाचक विशेषणें. |
| ऊं, वयास, यास. | करूं, करावयास, करायास. | भविष्यकालवाचक अव्ययें. |
| वयाचें-याचें. | करावयाचें*, करायाचें*. | विध्यर्थक विशेषणें. |

संयुक्तधातुसाधितें.

करीत असतां, करीत असतांना. अपूर्ण धातुसाधितें.

केलें असतां, केलें असतांना. पूर्णधातुसाधितें.

* ज्यांवर फुली आहे त्यांचा कधीं कधीं शुद्ध क्रियापदांप्रमाणें प्रयोग करितात. जसें:-बहुत काय लिहिणें. त्याला आज जावयाचें. तो उद्यां जाणार इ०.

१००. कित्येक धातुसाधितांपुढें **अस**धातूचीं क्रियापदें येऊन संयुक्त क्रियापदें होतात तीं.

| | वर्तमान. | भूत. | भविष्य. |
|---|---|---|---|
| अपूर्ण | करीत आहे | करीत होता | करीत असेल. |
| पूर्ण | केलें आहे<br>केलें असे | केलें होतें<br>केलें असे | केलें असेल. |
| रीति | करीत असतो | करीत असे | करीत असणार. |
| उद्देश्य | करणार आहे | करणार होता | करणार असेल. |
| विध्यर्थ | जायाचें आहे | जावें होतें किं.<br>जायाचें होतें. | जायाचें असेल. |

भूतविध्यर्थ—गेला असावा किंवा जायाचा असावा.

रीतिविध्यर्थ—जात असावें.

उद्देश्यविध्यर्थ—जाणार असावा.

संकेतार्थी अपूर्ण भूत—करीत असता किंवा असला.

संकेतार्थी पूर्ण भूत—केलें असतें किंवा असलें.

संकेतार्थी उद्देश्य भूत—करणार असता किंवा असला.

टीप—इत अ० त प्रत्ययान्त धातुसाधितांपुढें असधातूचें क्रियापद आलें ह्मणजे अपूर्ण काळ होतो. ह्या नियमास रीतिकाळ अपवादक होय. ला प्रत्ययान्त धातुसाधितापुढें अस धातूचें क्रियापद आले म्हणजे पूर्ण काळ होतो. णार प्रत्ययान्त धातुसाधितापुढें अस धातूचें क्रियापद आलें ह्मणजे उद्देश्य काळ होतो.

१०१. क्रियापदाचा संबंध, मी अ० आह्मी ह्या सर्वनामाकडे असला, म्हणजे तें प्रथमपुरुषी क्रियापद जाणावें. जेव्हां तूं अ० तुम्ही ह्या सर्वनामाकडे असतो, तेव्हां तें द्वितीयपुरुषी क्रियापद जाणावें. आणि जेव्हां क्रियापदाचा संबंध प्रथमपुरुषी अ० द्वितीयपुरुषी सर्वनामाकडे नसतो,

तेव्हां तें तृतीयपुरुषी जाणावें. जसें:—मी **करितों** ( प्र० पु० ), तूं **करितोस** ( द्वि० पु० ), रामा **करितो** ( तृ० पु० ).

**१०२.** कर्ता, कर्म ह्यांस अनुसरून किंवा स्वतंत्रपणें क्रियापदाची योजना होते, तिला **प्रयोग** ह्मणतात. हे प्रयोग तीन आहेत--**कर्तरि, कर्मणि** आणि **भावे.**

टीप—अकर्तृक क्रियापदांवरून जे प्रयोग होतात त्यांस कोणी भावकर्तरि प्रयोग ह्मणतात.

**१०३.** क्रियापदाचें रूप जेव्हां कर्त्याचें लिंग, वचन व पुरुष यांच्या अनुरोधानें असतें, तेव्हां त्या रचनेस **कर्तरि प्रयोग** ह्मणावें. जसें:—रामा जातो. यांत **जातो** हें क्रियापद **रामा** ह्या कर्त्याप्रमाणें पुल्लिंगी, एकवचनी आहे.

**१०४.** कर्माचें लिंग, वचन व पुरुष यांच्याप्रमाणें क्रियापदाचें रूप असलें, ह्मणजे त्या रचनेस **कर्मणि प्रयोग** ह्मणावें. जसें:—रामानें पत्र **लिहिलें.** यांत लिहिलें हें क्रियापद, त्याचें कर्म जें **पत्र,** त्याच्या लिंगवचनांप्रमाणें आहे. याप्रमाणेंच त्याला काम **करवतें,** मुलांनीं विद्या **शिकावी,** त्यानें घोडा **बांधिला** इ०.

**१०५.** जेव्हां क्रियापदाचें रूप वाक्यांतील कोणत्याच शब्दाच्या अनुरोधानें नसून, तें तृतीयपुरुषी, नपुंसकलिंगी, एकवचनी असतें, तेव्हां **भावे प्रयोग** जाणावा. जसें:—रामानें रावणास **मारिलें.** यांतील क्रियापद कोणत्याही शब्दाच्या लिंगवचनांप्रमाणें नसून तें नपुंसकलिंगी एकवचनीच आहे.

१०६. धातूवरून क्रियापदें कशीं होतात हें दाखवितों.

| | | कर धातु. वर्तमानकाळ स्वार्थ. | | पाव धातु. भूतकाळ स्वार्थ. | |
|---|---|---|---|---|---|
| पुरुष | लिंग | ए० व० | अ०व० | ए० व० | अ० व० |
| प्रथम पुरुष | पु० | करितों | करितों. | पावलों | पावलों. |
| | स्त्री० | करित्यें. | ,, | पावल्यें. | ,, |
| द्वितीय पुरुष. | पु० | करितोस | करितां. | पावलास | पावलां. |
| | स्त्री० | करित्येस | ,, | पावलीस. | ,, |
| | न० | करितेंस. | ,, | पावलेंस. | ,, |
| तृतीय पुरुष. | पु० | करितो | करितात. | पावला | पावले. |
| | स्त्री० | करित्ये. | ,, | पावली | पावल्या. |
| | न० | करितें. | ,, | पावलें | पावलीं. |

टीप—डमज, पढ, शीक, इ० डमज गणांतील धातूंखेरीज सकर्मक धातूंना वर्तमानकाळीं बहुत करून इ आगम होतो.

१०७. कित्येक धातूंला भूतकाळाचे प्रत्यय लागण्यापूर्वीं त्यांच्या रूपांत फेर होतो. ते धातु येथें सांगतों:—

| धातु. | रूप. | धातु. | रूप. | धातु. | रूप. |
|---|---|---|---|---|---|
| कर. | के. | माग. | मागित. | खण. | खण-खट. |
| जा. | गे. | सांग. | सांगित. | हो. | झा-जाह. |
| मर. | मे. | ह्मण. | ह्मणा, ह्मट. | वीझ. | विझा. |
| ये. | आ. | भी. | भिया-भ्या. | मीळ. | मिळा. |
| घे. | घेत. | पी. | पिया-प्या. | पळ. | पळा. |
| घाल. | घात. | गा. | गाइ. | दे. | दि. |
| बघ. | बघित. | नीघ. | निघा. | धू. | धुत. |

## रीतिभूतकाळ.

| कर धातु ( सकर्मक. ) | | | बस धातु ( अकर्मक. ) | |
|---|---|---|---|---|
| पुरुष. | ए० व०. | अ० व०. | ए० व०. | अ० व०. |
| प्र० पु०. | मी करीं, | आह्मी करूं. | मी बसें, | आह्मी बसूं. |
| द्वि० पु०. | तूं करीस, | तुह्मी करां. | तूं बसेस-सस, | तुम्ही बसां. |
| तृ० पु०. | तो करी, | ते करीत. | तो बसे, | ते बसत. |

टीप—एकाक्षरी अकर्मक धातु सकर्मक धातूंप्रमाणें चालतात. परंतु द्वि० पु० एकवचनीं स व तृ० पु० अ० वचनी त प्रत्यय लागतो. जसें:—मी जाईं, आह्मी जाऊं. तूं जाईस, तुह्मी जा. तो जाई, ते जाईत.

## भविष्यकाळ.

| कर धातु ( सकर्मक. ) | | | बस धातु ( अकर्मक. ) | |
|---|---|---|---|---|
| पुरुष. | ए० व०. | अ० व०. | ए० व०. | अ० व०. |
| प्र० पु०. | मी करीन, | आम्ही करूं. | मी बसेन, | आम्ही बसूं. |
| द्वि० पु०. | तूं करशील, | तुम्ही कराल. | तूं बसशील, | तुम्ही बसाल. |
| तृ० पु०. | तो करील, | ते करतील. | तो बसेल, | ते बसतील. |

टीप १—शुद्धवर्तमान, शुद्धभूत व शुद्धभविष्य या काळांना अकरणरूपें नाहींत. त्याबद्दल अनुक्रमें अपूर्णवर्तमान, पूर्णवर्तमान आणि उद्देश्यवर्तमान या काळांचीं अकरणरूपें योजितात. जसें:—तो करितो, तो करीत नाहीं. त्यानें केलें, त्यानें केलें नाहीं. तो करील, तो करणार नाहीं.

टीप २—तो जातो किंवा न जातो; त्यानें केलें किंवा न केलें; तो जाईल किंवा न जाईल, असे अकरणरूपाचे प्रयोग कधीं कचित् आढळतात. तसेंच सांगेना, करीना, अशीं भूतकाळाचींही अकरणरूपें आढळतात.

## आज्ञार्थ.

| पुरुष. | दे ( एकाक्षरी धातु. ) | | कर धातु. | |
|---|---|---|---|---|
| | ए० व०. | अ० व०. | ए० व०. | अ० व०. |
| प्र० पु०. | मी देऊं? | आम्ही देऊं. | मी करूं? | आह्मी करूं? |
| द्वि० पु०. | तूं दे | तुम्ही द्या. | तूं कर, | तुह्मी करा. |

| | | |
|---|---|---|
| तृ०पु०. | तो देवू ते देवूत. | तो करू, ते करूत. |
| | तो देवो ते देवोत. | तो करो, ते करोत. |

टीप १—आज्ञार्थाला कालभेद नाहीं. याचीं अकरणरूपें मी करूं नको; तूं करूं नको; तो न करो, ते न करोत. अशीं होतात.

| विध्यर्थ. जा धातु. | | | | संकेतार्थ. कर धातु. | |
|---|---|---|---|---|---|
| पुरुष. | लिंग. | ए०व०. | अ०व०. | ए०व. | अ०व. |
| प्र. | पु० | जावा. | जावे. | करितों. | करितों. |
| | स्त्री. | जावी. | जाव्या. | करितें-त्यें. | ,, |
| द्वि. | पु० | जावास, | जावे. | करितास. | करितां. |
| | स्त्री. | जावीस. | जाव्या. | करितीस. | ,, |
| | न० | जावेंस. | जावीं. | करितेंस. | ,, |
| तृ. | पु० | जावा. | जावे. | करिता. | करिते. |
| | स्त्री. | जावी. | जाव्या. | करिता. | करित्या. |
| | न० | जावें. | जावीं. | करितें. | करितीं. |

टीप २—ह्याचें अकरणरूप तो न करिता अ० करिता ना इ० असें होतें.

१०८. **अस, नस,** आणि **हो** हे धातु अनियमित आहेत. त्यांस सर्व आख्यातप्रत्यय लावून दाखवितों.

## अस—स्वार्थ—वर्तमानकाळ.

| प्रकार १ ला. | | | प्रकार २ रा. पुल्लिंग. | |
|---|---|---|---|---|
| पुरुष. | ए०व०. | अ०व०. | ए०व०. | अ०व०. |
| प्र०पु० | मी आहें. | आह्मी आहों. | मी असतों. | आह्मी असतों. |
| द्वि०पु० | तूं आहेस. | तुह्मी आहां. | तूं असतोस. | तुह्मी असतां. |
| तृ०पु० | तो, आहे. | ते आहेत. | तो असतो. | ते असतात. |

टीप—दुसऱ्या प्रकारच्या रूपांला करधातूच्या वर्तमान काळाच्या रूपांप्रमाणें लिंगविकार होतो.

| भूतकाळ | पुल्लिंग. | भविष्यकाळ ( लिंगत्रयीं ). | |
|---|---|---|---|
| पुरुष०. ए०व०. | अ०व०. | ए०व०. | अ०व०. |
| प्र० पु०. मी होतों. | आह्मी होतों. | मी असेन. | आह्मी असूं. |
| द्वि०पु०. तूं होतास. | तुह्मी होतां. | तूं असशील. | तुह्मी असाल. |
| तृ० पु०. तो होता. | ते होते. | तो असेल. | ते असतील. |

टीप १—वास्तविक रीतीनें पाहिलें तर हीं भूतकाळाचीं रूपें हो धातूच्या संकेतार्थाचीं आहेत. परंतु अस धातूच्या भूतकाळा ऐवजीं यांचा प्रयोग होतो.

टीप २—अस धातूचीं आज्ञार्थाचीं व विध्यर्थाचीं रूपें नियमाप्रमाणें होतात.

## संकेतार्थ पुल्लिंग.

| प्रकार १ ला. | | | प्रकार २ रा. | |
|---|---|---|---|---|
| | ए०व० | अ०व० | ए०व० | अ०व० |
| प्र० पु०. | असतों. | असतों. | असलों. | असलों. |
| द्वि० पु०. | असतास. | असतां. | असलास. | असलां-त. |
| तृ० पु०. | असता. | असते. | असला. | असले. |

टीप १—व्युत्पत्तिबलानें दुसऱ्या प्रकारचीं रूपें हीं अस धातूच्या भूतकाळाचीं असून, यांचा उपयोग संकेतार्थी होतो.

टीप २—अस धातूला वर्तमान, भूत आणि भविष्य यांच्या पोटभेदांचीं रूपें नाहींत; तथापि राहणें या अर्थी रीतिभूतकाळ असतो.

## सन धातु—वर्तमानकाळ—स्वार्थ.

| प्रकार १ ला-लिंगविकार नाहीं. | | | प्रकार २ रा-(लिंगत्रयीं). | |
|---|---|---|---|---|
| | ए०व० | अ०व० | ए०व० | अ०व० |
| प्र०पु०. | नाहीं. | नाहीं. | नव्हे. | नव्हों-त. |
| द्वि०पु०. | नाहींस. | नाहीं. | नव्हेस. | नव्हां. |
| तृ०पु०. | नाहीं. | नाहीं. | नव्हे. | नव्हेत-नव्हत. |

टीप १—तिसरा प्रकार नियमाप्रमाणें प्रत्यय लागून होतो.

टीप २—भूतकाळ, भविष्यकाळ, आज्ञार्थ, विध्यर्थ आणि संकेतार्थ यांचीं रूपें असधातूच्या रूपांसारखींच होतात.

## हो धातु-वर्तमानकाळ-स्वार्थ-पुल्लिंग.

**प्रकार १ ला-(लिंगविकार होतो.)**

| | ए० व० | अ० व० |
|---|---|---|
| प्र० पु०. | होतों. | होतों. |
| द्वि० पु०. | होतोस. | होतां. |
| तृ० पु०. | होतो. | होतात. |

**प्रकार २ रा-(लिंगत्रयीं).**

| | ए० व० | अ० व० |
|---|---|---|
| प्र० पु०. | होय. | होऊं. |
| द्वि० पु०. | होस. | व्हां. |
| तृ० पु०. | होय. | होत. |

**भूतकाळ ( पुल्लिंग ).**

| | ए० व० | अ० व० |
|---|---|---|
| प्र० पु०. | झालों. | झालों. |
| द्वि० पु०. | झालास. | झालां-त. |
| तृ० पु०. | झाला. | झाले. |

**भविष्यकाळ पुल्लिंग.**

| | ए० व० | अ० व० |
|---|---|---|
| प्र० पु०. | होईन. | होऊं. |
| द्वि० पु०. | होशील. | व्हाल. |
| तृ० पु०. | होईल. | होतील. |

**रीतिभूतकाळ–( लिंगत्रयीं ).**

| | ए० व० | अ० व० |
|---|---|---|
| प्र० पु०. | मी होई. | आह्मी होऊं. |
| द्वि० पु०. | तूं होईस. | तु व्हां. |
| तृ० पु०. | तो होई. | ते होत. |

**आज्ञार्थ-(लिंगविकार नाहीं).**

| | ए० व० | अ० व० |
|---|---|---|
| प्र० पु०. | होऊं. | होऊं. |
| द्वि० पु०. | हो. | व्हा. |
| तृ० पु०. | होवो. | होवोत. |

**संकेतार्थ(लिंगविकार होतो).**

| | ए० व० | अ० व० |
|---|---|---|
| प्र० पु०. | होतों. | होतों. |
| द्वि० पु०. | होतास. | होतां. |
| तृ० पु०. | होता. | होते. |

टीप—हीं संकेतार्थीं रूपें असधातूच्या भूतकाळाचीं ही मानिलीं आहेत.

१०९. **पाहिजे, नको, नलगे आणि नये** ह्या **सिद्धधातूंचीं** रूपें बहुतकरून **स्वार्थी** व **वर्तमानकाळीं** होतात.

| | प्र० पु० | द्वि० पु० | तृ० पु० |
|---|---|---|---|
| ए० व० | पाहिजे. | पाहिजेस. | पाहिजे. |
| अ० व० | पाहिजे. | पाहिजे. | पाहिजेत. |
| ए० व० | नको. | नकोस. | नको. |
| अ० व० | नको. | नका, नको. | नकोत. |

११०. कांहीं धातूंचीं क्रियापदें इतर धातूंच्या कृदन्तांपुढें योजिलीं असतां त्यांचा विशेष अर्थ होऊन तीं संयुक्त धातूंचीं क्रियापदें किंवा संयुक्त क्रियापदें मानावीं लागतात.

(अ) ऊं अ० **आवयास** प्रत्ययान्त कृदन्तापुढें **दे, कर, लाग, शक, नको,** आणि **नये** ह्या धातूंचीं क्रियापदें आलीं असतां **संयुक्तक्रियापदें** होतात तीं:—

१ त्यानें त्याला **जाऊं दिलें** (मोकळीक दिली).
२ त्यानें मला पैसे **देऊं केले** (कबूल केले).
३ तो तें **करूं लागला** (आरंभ केला).
४ तूं तें **करूं नको** (कर याचें अकरणरूप).
५ त्यानें तें **करूं नये** (करावें याचें अकरणरूप).
६ तो **जाऊं शकला** (जाववलें).

(आ) **ऊन** प्रत्ययान्त कृदन्तापुढें **ठेव, बस, जा, घे, चूक** इ० धातूंचीं क्रियापदें आलीं असतां **संयुक्तक्रियापदें** होतात तीं:—

१ त्यानें घर **बांधून ठेविलें** (कांहीं उद्देशानें बांधिलें).
२ तो त्याचें घर **घेऊन बसला** (बळकाविलें).
३ तो पैसे **खाऊन गेला** (बुडविले).
४ त्यानें त्याला **पाहून घेतलें** (सूड उगविला).
५ तो काम **करून घेतो** (करवितो).

६ तो **बोलून चुकला** अ० **गेला** ( बोलला, आतां उपाय नाहीं ).

( इ ) **त** प्रत्ययान्त कृदन्तापुढें **ठेव, वस, ये, जा, राह, सूट, पड, घाल** आणि **आण** इ० धातूंचीं क्रियापदें आलीं असतां **संयुक्तक्रियापदें** होतात तीं:—

१ तो **लिहित बसतो** अ० **राहतो** (एकसारखें लिहितो).

२ तो हें **करीत आला** } अमुक काळा पासून अमुक
३ तो असें **करीत गेला** } काळा पर्यंत केलें.

४ हें काम **भिजत पडलें** ( लांबलें ).

५ त्यानें घर **बांधीत आणिलें**, ( बहुतेक बांधिलें ).

( ई ) **तां** प्रत्ययान्त कृदन्तापुढें कोणतेंही क्रियापद आलें असतां **शक्यक्रियापदा**प्रमाणें त्याचा प्रयोग होतो. जसें:— त्याला **जातां येतें** ( **जाववतें** ).

( उ ) **ला** प्रत्ययान्त कृदन्तापुढें **जा** धातूचें क्रियापद येऊन **संयुक्तक्रियापद** होतें. व त्यावरून **कर्मणि प्रयोग** होतो. जसें:—तो **धरिला जातो,** ह्या अर्जाचा निकाल **केला जाईल** इ०.

१११. ह्याप्रमाणें जीं क्रियापदें कृदन्तांपुढें योजिलीं असतां त्यांचा **काळ** व **अर्थ** फिरवितात त्यांस **सहाय क्रियापदें** ह्मणतात. जसें:—**अस, नस, दे, कर, लाग, नको, नये, ठेव, बस, जा, घे, चूक, पड, ये, राह, सूट, घाल, आण** इ०.

## अव्ययविचार.

११२. ज्या शब्दांस लिंग, वचन, विभक्ति इत्यादि लागून बहुतकरून कांहीं विकार होत नाहीं, त्यांस **अव्ययें** ह्मणावें. यांचे मुख्य भेद पांच आहेत.—**क्रियावि-**

शेषण, उभयान्वयी, शब्दयोगी, केवलप्रयोगी, आणि वाक्यपूरक.

## क्रियाविशेषण.

११३. जें अव्यय क्रियेचा प्रकार, स्थल, काल इ० दाखवितें तें **क्रियाविशेषण** होय.

११४. हीं क्रियाविशेषणें दहा प्रकारचीं आहेत तीं:-

( अ ) क्रिया **केव्हां** घडली असें दाखविणारीं तीं **कालवाचक क्रियाविशेषणें** होत. जसें:—**जेव्हां, केव्हां, काल, उद्यां, परवां, यंदां, गुदस्तां, सदां, सदोदित एकाएकीं, निरंतर, आतां, मग, वारंवार, लवकर, हरघडी, अकस्मात्, सतत, लागलेंच, दरमहा, जों, तों, नेहमीं, पूर्वीं, अजून** इ०.

( आ ) क्रिया **कोठें** घडली हें दाखविणारीं तीं **स्थलवाचक क्रियाविशेषणें** होत. जसें:—**येथें, तेथें, इकडे, तिकडे, कोठें, खालीं, खालतीं, वर, वरती, मागें, पुढें, समोर, लांब, दूर, लांबून, दुरून, जवळ, जवळून, सभोंवती, आसपास, सर्वत्र, एकत्र, आंत, बाहेर, बाहेरून, आंतून, पलीकडे** इ०.

( इ ) क्रियेची **आवृत्ति** दाखविणारीं तीं **आवृत्तिवाचक क्रियाविशेषणें.** जसें:—**एकदां, दोनदां** इ० **दां** प्रत्ययान्त.

( ई ) क्रियेचा **क्रम** दाखविणारीं तीं **क्रमवाचक क्रियाविशेषणें.** जसें:—**पहिल्यानें, दुसऱ्यानें** इ०.

( उ ) क्रियेचा **निश्चय** दाखविणारीं तीं **निश्चयार्थक क्रि० वि०.** जसें:—**खचित, खास, खरोखर, निखालस, निःसंशय** इ०.

· ( ऊ ) **संशय** दाखविणारीं तीं **संशयार्थक क्रि० वि०.** जसें:—**कदाचित्, क्वचित्, प्रायः, बहुधा.**

( ऋ ) जीं धातुसाधितें क्रियाविशेषणाप्रमाणें योजितात तीं **धातुसाधित क्रियाविशेषणें.** जसें:—**हंसत, बोलत, उठतां, बसतांना** इ०.

( ॠ ) जीं अव्ययें क्रियेचा केवळ **प्रकार** दाखवितात तीं **शुद्धक्रियाविशेषणें.** जसें:—**अगदीं, साफ, समूळ, दाटून, सपाटून, मुद्दाम, बुद्ध्या, हळू, हटकून** इ०.

( ऌ ) **अनुकरणवाचक—झटकन, पटदिशीं, गटगटां, भरभरां** इ०.

( ॡ ) गुणविशेषणें कधीं कधीं क्रियेचा गुण दाखवितात, तेव्हां त्यांस **गुणवाचक क्रियाविशेषणें** ह्मणावीं. जसें:—तो **चांगलें** लिहितो. ती **आडवी** जाते इ०.

११९. पुल्लिंगी आकारान्त गुणविशेषणाचीं क्रियाविशेषणें होतात तीं कर्ता, कर्म, किंवा धात्वर्थ यांच्या लिंगवचनांप्रमाणें फिरतात. तीं येणें प्रमाणें:—

( अ ) क्रियापद अकर्मक असतां हें क्रियाविशेषण कर्त्याच्या लिंगवचांनप्रमाणें असतें. जसें:—ती **वांकडी** चालते, तो **उभा** राहतो इ०.

( आ ) क्रियापद सकर्मक असलें तर हें क्रियाविशेषण कर्माच्या लिंगवचनांप्रमाणें असतें. जसें:—तो **डगलें** उलटें शिवतो, ती श्लोक **चांगला** ह्मणत्ये इ०.

( इ ) जर ह्या क्रियाविशेषणाचा अन्वय क्रियापदाकडेसच असेल तर हें नेहमीं नपुंसकलिंगी असतें. जसें:—ती **चांगलें** वाचतो, ती **उभें** शिवत्ये इ०.

## उभयान्वयी अव्ययें.

**११६.** ज्या अव्ययांनी दोन एकजातीय शब्दांचा अ० वाक्यांचा अन्वय होतो तीं **उभयान्वयी अव्ययें** होत. यांचे अर्थावरून जे भेद मानिले आहेत ते—

( अ ) दोन वाक्यें जोडून त्यांचा अर्थ वाढविणारीं तीं **समुच्चयार्थक उभयान्वयी अव्ययें.** जसें:—**आणि, व, आणखी** इ०.

( आ ) जोडलेल्या दोन वाक्यांपैकीं एक दुसऱ्याशीं कांहींसें उलट अर्थाचें आहे असें दाखविणारें तें **न्यूनत्वबोधक उभयान्वयी अव्यय.** जसें:—**पण, परंतु** इ०.

( इ ) दोन वाक्यें जोडून त्यांपैकीं कोणतें तरी एक खरें असा बोध करणारें तें **विकल्पदर्शक उभयान्वयी अव्यय.** जसें:—**किंवा, अगर, अथवा** इ०.

( ई ) जोडलेल्या दोन वाक्यांपैकीं एक दुसऱ्यावर अवलंबून आहे, असा बोध करणारें तें **संकेतार्थक उभयान्वयी अव्यय.** जसें:—**जर, तर, तथापि, जरी, तरी** इ०.

( उ ) दोन वाक्यें जोडून त्यांपैकीं एक दुसऱ्याचें कारण, असें दाखविणारें तें **कारणबोधक उभयान्वयी अव्यय.** जसें:—**कीं, ह्मणून, कांकीं** इ०.

( ऊ ) जोडलेलीं दोन वाक्यें एकाच अर्थाचीं असें दाखविणारें तें **स्वरूपबोधक उभयान्वयी अव्यय.** जसें:—**ह्मणजे, ह्मणून, कीं** इ०.

( ऋ ) वाक्याचा गुप्त वाक्याशीं संबंध आहे असें दाखविणारें तें **अवधारणार्थक उभयान्वयी अव्यय.** जसें:—**च, ही, देखील** इ०.

टीप—ह्या अव्ययांना कोणी शुद्धशब्दयोगी अव्ययें ह्मणतात; परंतु उभयान्वयीअव्ययांचें लक्षण यांना चांगलें लागतें. जसें:—तोच आला. येथेंच हें अव्यय "तो आला" याचा संबंध "दुसरा आला नाहीं" ह्या गुप्त वाक्याशीं दाखवितें.

## शब्दयोगी अव्ययें.

११७. जीं अव्ययें नामवाचक शब्दांला लागून त्यांचा संबंध क्रियापदाकडे दाखवितात व नामवाचकशब्दांचें सामान्यरूप करितात, त्यांस **शब्दयोगी अव्ययें** ह्मणतात.

**अपवाद्**—पावेतों, पर्यंत, भर इ० शब्दयोगी अव्ययांनीं नेहमीं सामान्यरूप होत नाहीं. जसें:—घर **पावेतों**, शेर **भर**, एक कोस **पर्यंत**.

११८. हीं अव्ययें विभक्तीचीं कार्यें करितात, त्यापैकीं कांहीं सांगतों.

तृतीया....**करून, द्वारें, मुळें, कडून, सह, सहित** इ०.
चतुर्थी....**प्रत, लागीं, कारणें, करितां, साठीं** इ०.
पंचमी....**पेक्षां, पासून, कडून, वरून** इ०.
षष्ठी ....**विषयीं, संबंधीं** इ०.
सप्तमी....**वर, मध्यें, ठायीं, माजी** इ०.

११९. **पूर्वीं, मागें, पुढें, समोर, जवळ, खालीं, वर, पलीकडे, भोंवतीं, बाहेर, आंत** इ० कालबोधक व स्थलबोधक अव्ययें **क्रियाविशेषणें**ही होतात.

१२०. शब्दयोगी अव्ययांला **चा, ईल, ला** हे प्रत्यय लागून **त्यांजवरून** विशेषणें होतात. जसें:—**वरचा, वरील, वरला** इ०. यांच्या योगानेंही नामाचें सामान्यरूप होतें.

## केवलप्रयोगी अव्ययें.

१२१. हीं अव्ययें, **दुःख, हर्ष, विस्मय, तिरस्कार** इ० मनोविकारांचा बोध करितात तीं:—

१ हर्षसूचक..........वः, वाहवा इ०.
२ तिरस्कारदर्शक ....छिः, थुः, छट् इ०.
३ धन्यतादर्शक........शाबास, भले इ०.
४ आर्जवदर्शक ........जी इ०.
५ आश्चर्यदर्शक ........अहाहा, बब इ०.

१२२. मनाच्या विकाराचा बोध न करणारीं अशींही अव्ययें आहेत त्यांस **वाक्यपूरक** अव्ययें ह्मणतात. जसें:– मी **आपला** जातों. होऊं दे **परतें** कांहींतरी. यांत **आपला, परतें** हीं **वाक्यपूरक अव्ययें** होत.

टीप—केवलप्रयोगी अव्ययें व वाक्यपूरक अव्ययें यांचा वाक्यांत दुसऱ्या शब्दांशीं कोणत्याही प्रकारचा संबंध नसतो.

१२३. संबोधनार्थी केवलप्रयोगी अव्ययांना लिंग-विकार होतो.

| | ए० व०. | अ० व०. |
|---|---|---|
| पु० | **अरे, रे, अगा.** | **अहो.** |
| स्त्री० | **अगे, अगो, गे इ०.** | ,, |

## सामासिकशब्दविचार.

१२४. दोन अथवा अधिक शब्दांचा संयोग होऊन व त्यांतील विभक्त्यादिकांचा लोप होऊन एक शब्द होतो, त्याला **समास** ह्मणतात.

१२५. समासाचीं पदें वेगळीं करून त्यांचा परस्परांशीं संबंध ज्या शास्त्रीय वाक्यानें सांगतात, त्यास **विग्रह** ह्मणतात.

१२६. मुख्य समास चार आहेतः–**द्वंद्व, तत्पुरुष, बहुव्रीहि,** आणि **अव्ययीभाव.**

१२७. समुच्चयार्थक उभयान्वयी अव्ययानें जोडलेल्या शब्दांमधील तें अव्यय लोपून जो समास होतो, त्याला

**द्वंद्वसमास** ह्मणतात. जसें:–**आईबाप** (आई आणि बाप). **हरिहर** (हरि आणि हर). याचप्रमाणें **रामलक्ष्मण, भीष्मार्जुन, नवराबायको, इटीदांडू** इ०.

टीप—ह्या सामासांतील प्रत्येक पद मुख्य असून त्यांचा एकमेकांशीं समुच्चयरूप अन्वय असतो.

**१२८.** द्वंद्वसमासाचा अर्थ व्यापक ह्म० अधिक वस्तु दाखविणारा असा असला, म्हणजे त्याला **समाहारद्वंद्व** म्हणावें. जसें:–**हातपाय** (शरीरसंपत्ति) धड, तर सर्व मिळेल. याचप्रमाणें **शेटसावकार, मठिभाकर** इ०.

टीप—ह्या समासिक शब्दांला विभक्ति लागली तर बहुतकरून पूर्वपदाचें सामान्यरूप होतें. किंवा तें पद सविभक्तिक होतें; जसें:–हातापायांनीं, घरींदारीं, नाकींडोळीं, नाक्यानाक्यांनीं इ०.

**१२९.** ज्या सामासिक शब्दांत पूर्व शब्द नाम असून ज्याचा विग्रह करितांना प्रथम पदाला प्रथमा व संबोधन खेरीज कोणती तरी विभक्ति लागते व ज्यांत उत्तरपद मुख्य असतें त्याला **तत्पुरुषसमास** म्हणावें. याचे प्रकार:—

१ **तृतीयातत्पु०–द्रव्यसाध्य** (द्रव्यानें जें साध्य तें). **वस्त्रगाळ** (वस्त्रानें गाळलेलें तें), **ईश्वरनिर्मित** (ईश्वरानें जें निर्मित तें), **उपासमर** (उपासानें जी मर ती) इ०.

२ **चतुर्थीतत्पु०–पोळपाट** (पोळीसाठीं जो पाट तो), **कृष्णार्पण** (कृष्णाला जें अर्पण तें), **गायरान** (गाईकरितां जें रान तें), **बाइलवेडा** इ०.

३ **पंचमीतत्पु०–ऋणमुक्त** (ऋणापासून जो मुक्त तो), **स्वर्गपतन** (स्वर्गापासून जें पतन तें), **चोरभय** (चोरापासून भय तें), **भवतारण** इ०.

४ **षष्ठीतत्पु०–राजवाडा** (राजाचा जो वाडा तो), **देवपूजा** (देवाची जी पूजा ती), **हातचाळा** (हाताचा

जो चाला तो ), **मत्कार्य** ( माझें जें कार्य तें ), **त्वद्गुण** ( तुझे जे गुण ते ), **तन्नाम, मद्धरण, युष्मत्पद, अस्मल्लीला, स्वदेश, निजधाम, आपमतलब** इ०.

९ **सप्तमीतत्पु०—स्वर्गवास** ( स्वर्गांत वास ), **ग्रामप्रवेश** ( ग्रामांत प्रवेश ), **शास्त्रनिपुण** इ०.

१३०. **नाहीं** या अर्थी **अ** किंवा **अन्** यांचा शब्दांशीं समास झाला म्हणजे त्यास **नञ्तत्पुरुषसमास** म्हणतात. जसें:—**अन्याय** ( नव्हे जो न्याय तो ), **अनिष्ट** इ०.

१३१. ज्या तत्पुरुषसमासांत द्वितीय पद धातुसाधित असतें त्यांला **उपपदसमास** म्हणतात. जसें:—**शेषशायी** ( शेषावर शयन करणारा ), **गृहस्थ** ( गृह करून राहणारा ), **भाजीविक्या** ( भाजी विकणारा तो ), **आगलाव्या** ( आगीतें लावणारा ) इ०.

१३२. **कर्मधारयसमास** म्हणून तत्पुरुषाचा एक भेद आहे. यांत पहिलें पद विशेषण असून दुसरें पद **नाम** म्हणजे त्या विशेषणाचें विशेष्य असतें. जसें:—**तांबडमाती** ( तांबडी अशी जी माती ), **ब्रह्मर्षि** ( ब्राह्मण असा जो ऋषि तो ), **पोकळखर्च** ( पोकळ असा जो खर्च तो ), **घडकाम** ( घडलेलें जें काम तें ) इ०.

( अ ) **उपमान** ( ज्याची उपमा द्यावयाची तें ) आणि **उपमेय** ( ज्यास उपमा द्यावयाची तें ) यांचा समास होतो, त्यासही **कर्मधारयसमास** म्हणतात. जसें:—**विद्याधन** ( विद्या हेंच धन ), वचनामृत इ०.

टीप—यांत अमुक पद पहिलें असावें, असा नियम नाहीं. जसें:—शुंडास्वबाहु ( स्वबाहु हीच शुंडा ) मुखकमल ( कमलासारखें मुख ), पुरुषसिंह ( सिंहासारखा पुरुष ) इ०.

१३३. ज्या कर्मधारयसमासांतील मधल्या पदांचा लोप होतो, त्याला **मध्यमपदलोपीसमास** म्हणतात. जसें:—**घरजांवई** ( घरांत ठेविलेला जो जांवई तो ),**साखरभात** ( साखर घालून केलेला जो भात तो ), **बाळमित्र** ( बाळपणापासून असलेला जो मित्र तो ), **गर्भश्रीमंत** ( गर्भांत असल्यापासून जो श्रीमंत तो ), **आतेबहीण** ( आतेची मुलगी ह्या संबंधानें बहीण ), **नातजांवई** ( नातीचा नवरा या संबंधानें जांवई ), इ०.

१३४. कर्मधारयसमासांत पहिलें पद संख्याविशेषण असतें, तेव्हां त्याला **द्विगुसमास** म्हणतात. जसें:—**त्रिभुवन** ( तीन भुवनांचा समुदाय ); **पंचपाळें** ( पांच पाळ्यांचा समुदाय ), **बारभाई** ( बारा प्रकारच्या मनुष्यांचा समुदाय ), **पांचशेरी** (पांच शेरांचा समुदाय) इ०.

टीप—हा समास अमुकाचा समुदाय या अर्थींच होतो.

१३५. दोन शब्दांचा समास होऊन त्यावरून तिसऱ्या पदाचा बोध होतो, त्याला **बहुव्रीहिसमास** म्हणतात. हा सामासिक शब्द विशेषण असतो. जसें:—**चक्रपाणि** ( चक्र आहे पाणीमध्यें ज्याच्या तो ), **नीलवर्ण** ( नील आहे वर्ण ज्याचा तो ), **कमलनेत्र** ( कमलासारखे आहेत नेत्र ज्याचे तो ), **लंबोदर** ( लंब आहे उदर ज्याचें तो ), **विषकंठ** ( विष आहे कंठीं ज्याच्या तो ) इ०.

टीप—ज्या समासाच्या विग्रहांत संबंधीसर्वनाम प्रथमेतरविभक्तींत असतें त्यास बहुव्रीहिसमास ह्मणावें.

१३६. ज्या सामासिक शब्दांतील पहिलें पद अव्यय असून तो सामासिक शब्द क्रियाविशेषण असतो, त्याला **अव्ययीभावसमास** ह्मणावें. जसें:—**यथामनोरथ**

( मनोरथाप्रमाणें ), **आमरण** ( मरणपर्यंत ), **दररोज** ( प्रत्येक दिवशीं ), **हरघडी** इ०.

---

## ३ वाक्यविचार.

**१३७.** ज्या शब्दसमुदायानें बोलणाराचा अभिप्राय स्पष्ट कळून येतो त्या शब्दसमुदायास **वाक्य** ह्मणावें.

**१३८.** **शुद्ध**, **मिश्र** आणि **संयुक्त** असें वाक्याचे तीन भेद आहेत.

**१३९.** शुद्ध वाक्यांत एकच उद्देश्य ( कर्ता ) आणि एकच विधेय ( क्रियापद ) असतें. जसें:—**विष्णु आला.** यांत **विष्णु** हें उद्देश्य आणि **आला** हें विधेय.

टीप १—उद्देश्यपद विशेषण, सर्वनाम व षष्ठ्यन्तनाम यांनीं वाढवितां येतें. आणि विधेयपद क्रियाविशेषण, शब्दयोगीअव्ययुक्त नाम व सविभक्तिक नाम यांनीं वाढवितां येतें.

टीप २—क्रियापदास विधेय ह्मणतात व क्रियापद ज्या पदावर अवलंबून असतें तें पद त्या क्रियापदाचें उद्देश्य होय. ह्मणून कर्तरि प्रयोगांत कर्तृपद उद्देश्य असतें. कर्मणि प्रयोगांत कर्मपद उद्देश्य आणि भावे प्रयोगांत धात्वर्थ उद्देश्य असतो.

**१४०.** मिश्र वाक्यांत एक शुद्ध वाक्य असून त्यावर अवलंबून असणारें एक किंवा अधिक गौण वाक्यें असतात. जसें:—तो बसला, तेथेंच झोंपीं गेला. यांत बोलणारास मुख्यत्वेंकरून, **तेथेंच** ( तो ) **झोंपीं गेला**, हें वाक्य सांगावयाचें आहे. ह्मणून हें **प्रधानवाक्य** होय. आणि ( जेथें ) **तो बसला** हें प्रधानवाक्याच्या पुष्टीकरणार्थ जोडलेलें वाक्य आहे. ह्मणून हें **गौणवाक्य** होय.

**१४१.** गौणवाक्यांत **नामवाक्य**, **विशेषणवाक्य** आणि **क्रियाविशेषणवाक्य** असे तीन भेद आहेत.

१४२. नामदर्शक गौणवाक्य, प्रधानवाक्यापूर्वी असल्यास, तें व प्रधानवाक्य यांच्यामध्यें **असें** किंवा **हें** शब्द येतो. जसें:—मी येणार नाहीं, **असें** तो ह्मणाला. त्यानें चोरी केली, **हें** उघड आहे.

( अ ) परंतु प्रधानवाक्य पूर्वी असेल, तर तीं वाक्यें **कीं** ह्या अव्ययानें जोडावीं. जसें:—त्यानें ह्मटलें **कीं**, मी येणार नाहीं.

१४३. विशेषणवाक्यांत संबंधीसर्वनाम प्रथम असतें व त्याशीं अनुरूप असें दर्शकसर्वनाम प्रधानवाक्यांत असतें. जसें:—**जो** चोरी करितो, **त्याला** दंड होतो.

१४४. मिश्रवाक्यांत जें वाक्य प्रधानवाक्याशीं क्रियाविशेषणरूप संबंध दाखवितें तें. यांत **संबंधी**, **कारणदर्शक** व **संकेतदर्शक** असे तीन भेद आहेत.

१ **संबंधी**—**जिकडे** जावें **तिकडे** हेंच. मी जाईन **तेव्हां** तुला नेईन. तो जातो **तेथें** त्याला मित्र मिळतात.

२ **कारणदर्शक**—तो इतका रागावला **कीं** मी भिऊन गेलों. तंटा मिटवावा **ह्मणून** मी आलों. **ज्यापक्षीं** तूं माझें ऐकत नाहींस, **त्यापक्षीं** तुला शिक्षा केली पाहिजे.

३ **संकेतदर्शक**—येशील **तर** बरें होईल इ०.

१४५. संयुक्तवाक्यांत शुद्ध किंवा मिश्र वाक्यें दोन किंवा दोहोंहून अधिक असतात. जसें :—तो मुलगा हुशार आहे पण अशक्त आहे. तो शाळेंत गेला, कांहीं वेळ तेथें बसला आणि मग घरीं आला. चणे आहेत, तेथें दांत नाहींत आणि दांत आहेत तेथें चणे नाहींत. इ०.

## कारकविचार.

१४६. विभक्तीच्या द्वारें नामाचा क्रियापदाशीं जो संबंध

त्यास **कारक** ह्मणतात. विभक्ति व त्यांची कारकें पुढें दिल्याप्रमाणें जाणावीं.

प्रथमा–**कर्ता, कर्म, उद्देश्य, संप्रदान, परिमाण** आणि **अधिकरण.** जसें:—

**रामा** वसतो यांत, **रामा** ही **कर्तरि** प्रथमा.

रामा **गाय** बांधितो–**गाय** ह्या प्रथमेचा अर्थ **कर्म.**

रामा **ब्राह्मण** आहे–**ब्राह्मण** ही **उद्देश्यार्थी** प्रथमा.

चार रुपये **शेंकडा**–**शेंकडा** ही **संप्रदानी** प्रथमा.

दोन **शेर** गूळ–**शेर** ही **परिमाणार्थी** प्रथमा.

तो दोन कोस **जमीन** चालला–यांत **जमीन** ही **अधिकरणार्थी** प्रथमा.

तृतीया–**कर्ता, करण** ( साधन ), **हेतु** ( निमित्त ), **साहित्य** ( सहित असा अर्थ असतां ), **सन्निधान** ( जवळ असणें या अर्थी ) इ०. **रामानें** गाय बांधिली–**रामानें–कर्ता.** तो **पायांनीं** चालतो–**पायांनीं–करण. अन्नानें** सर्व जाईल–**अन्नानें–हेतु.** एका **वस्त्रानें** जाऊं नये–**वस्त्रानें–साहित्य.** वाघाला **झाडाशीं** बांध–**झाडाशीं–सन्निधान.**

चतुर्थी–**कर्ता, कर्म, संप्रदान** ( ज्या कारणें क्रिया घडते असा अर्थ ), **अधिकरण, संबंध, अपादान** इ०. **त्याला** जाववतें–**त्याला–कर्ता.** रामानें **गाईला** बांधिलें–**गाईला–कर्म.** तो **ब्राह्मणाला** दक्षिणा देतो–**ब्राह्मणाला–संप्रदान.** तो **गांवास** गेला–**गांवास–अधिकरण. रामाला** मुलगा आहे–**रामाला–स्वामित्व.** तो **जिवास** मुकला–**जिवास–अपादान.**

पंचमी–**अपादान** ( वियोग ), **तुलना.** तो **घरून**

आला—घरून—**अपादान.** कोण्याहून मऊ—**लोण्याहून—तुलना.**

षष्ठी—**स्वामित्व, अपादान, अधिकरण, करण, संप्रदान. रामाचें** घर—**रामाचें—स्वामित्व. जन्माचा** मुका—**जन्माचा—अपादान. रात्रीची** जागत्ये--**रात्रीची—अधिकरण. मनाचा** मोकळा—**मनाचा—करण. पुस्तकाचें** कपाट—**पुस्तकाचें—संप्रदान.**

टीप—ह्या विभक्तीचा संबंध नामाकडे किंवा विशेषणाकडे असतो.

सप्तमी—**अधिकरण.** ( अमुक स्थलीं किंवा अमुक कालीं क्रिया घडली असा अर्थ ). तो **घरीं** गेला—**घरीं—स्थलाधिकरण.** तो एके **दिवशीं** पुण्यास गेला—**दिवशीं** हें **कालाधिकरण.**

## प्रयोग.

१४७. कर्तरि प्रयोगांत कर्त्याची विभक्ति **प्रथमा** व कर्माची **चतुर्थी** किंवा **प्रथमा** असत्ये.

१४८. **वर्तमान, अपूर्णवर्तमान, उद्देश्यवर्तमान, अपूर्णभूत, रीतिभूत, उद्देश्यभूत, भविष्य, अपूर्णभविष्य** आणि **उद्देश्यभविष्य** ह्या काळीं सकर्मक धातूंवरून **कर्तरि प्रयोग** होतो.

१४९. उमज, ओक, शीक इ० सकर्मक धातु व सर्व अकर्मक धातु यांच्या सर्व काळीं क्रियापदांवरून **कर्तरि प्रयोग** होतो.

१५०. आज्ञार्थी नेहमीं **कर्तरि प्रयोग** होतो. आणि विध्यर्थी अकर्मक धातूंवरून भूतकाळीं क्रियापदाशिवाय **संभव** या अर्थी **कर्तरि प्रयोग** होतो.

१५१. प्रयोजकभेदीं सर्व धातु सकर्मक असतात, म्हणून १४८ नियमाप्रमाणें त्यांवरून **कर्तरि प्रयोग** होतो.

टीप—ह्या सर्व नियमांस शक्यभेदी क्रियापदें अपवादक आहेत. व संकेतार्थी सकर्मकधातूंच्या पूर्णभूतकाळाशिवाय हाच प्रयोग होतो.

१५२. कर्मणिप्रयोगांत कर्ता प्राणिवाचक नाम किंवा सर्वनाम असून, तो तृतीयान्त किंवा चतुर्थ्यन्त असतो. व कर्म प्रथमान्त असून त्याच्या लिंगवचनांप्रमाणें क्रियापद असतें.

टीप १—कर्मणिप्रयोगांतही क्वचित्प्रसंगीं कर्माची चतुर्थी करण्याचा पाठ पडत चालला आहे. जसें:—त्यानें तिला खूब बडविली. रामानें गोविंदाला असा मारला कीं काय सांगूं इ०.

टीप २—कर्मणिप्रयोगांत द्वितीयपुरुषी कर्ता असतां बहुतकरून क्रियापद द्वितीयपुरुषी योजण्याचा प्रघात पडत चालला आहे. जसें:-तूं काम केलेंस काय? तूं मला हें पुस्तक दिलेंस ना? तुह्मीच मोठी चूक केलीत इ०.

(अ) पूर्णवर्तमान, भूत, पूर्णभूत आणि पूर्णभविष्य ह्या काळीं सकर्मकधातूंच्या क्रियापदांवरून कर्मणि प्रयोग होतो. परंतु पढ, शीक, समज, चूक इ० धातु अपवादक आहेत. तसेंच आचर, पांघर, धू, जिंक इ० धातूंवरून कर्मणि किंवा कर्तरि प्रयोग होतो. जसें:—तो व्रत आचरला किंवा त्यानें व्रत आचरिलें.

१५३. शक्यभेदी सर्व सकर्मकधातूंच्या क्रियापदांवरून नेहमीं हाच प्रयोग होतो.

१५४. भावे प्रयोगांत कर्ता तृतीयान्त किंवा चतुर्थ्यन्त असतो. व कर्म असल्यास तें चतुर्थ्यन्त असतें.

टीप—भावे प्रयोगाचा कर्ता किंवा कर्म हीं प्राणिवाचक नामें किंवा सर्वनामें असतात.

१५५. सकर्मक धातूंच्या क्रियापदांवरून भावे प्रयोग होतात, ते कर्मणि प्रयोगासंबंधी जे नियम आहेत त्या नियमांप्रमाणेंच होतात. भेद इतकाच कीं यांतील कर्म चतुर्थ्यन्त असतें.

१५६. अकर्मक धातूच्या शक्यभेदी व विध्यर्थी (संभव हा अर्थ नसतां) क्रियापदावरून भावे प्रयोग होतो.

टीप—अकर्तृक क्रियापदावरून हाच प्रयोग होतो.

## पदानुक्रम.

१५७. वाक्यांतील क्रियापद अकर्मक असतां त्यांत प्रथम कर्ता व मग क्रियापद अशी पदयोजना असावी. परंतु क्रियापद सकर्मक असलें तर प्रथम कर्ता, मग कर्म आणि नंतर क्रियापद अशी योजना असावी.

१५८. अनेक पुरुषवाचक कर्ते असून ते समुच्चय-वाचक उभयान्वयीअव्ययानें जोडले असतां क्रियापदाचें रूप कसें असतें व कर्त्यांची व्यवस्था कशी असते तें:— .

| कर्ते. | | क्रियापद. | |
|---|---|---|---|
| प्र० पु०, | द्वि० पु०. | प्र० पु० | अनेकवचनी. |
| प्र० पु०, | तृ० पु०. | प्र० पु० | अनेकवचनी. |
| द्वि० पु०, | तृ० पु०. | द्वि० पु० | अनेकवचनी. |
| प्र० पु०, | द्वि० पु०, तृ० पु०. | प्र० पु० | अनेकवचनी. |

**उदाहरणें:**—मी व तूं हें काम **करूं.** मी व तो रामाला **भेटलों.** तूं व तो काल **खेळलांत.** मी, तूं व तो काल **खेळत होतों.**

१५९. कर्मपदाविषयीं विशेषेंकरून सांगावयाचें असेल तर तें कर्त्यापूर्वी येतें. जसें:—**हें घर** रामानें बांधिलें. **ही पुस्तीं** कोणीं काढिली? इ०.

( अ ) कर्मपदाविषयीं विशेष बोलावयाचें असून धिक्कारानें किंवा निंदेनें सांगावयाचें असतां कर्मपद शेवटीं येतें. जसें:—तो शिकेल आतां **विद्या !**

( आ ) धिक्कारानें किंवा त्रासनें बोलावयाचें असून क्रियापदावर नेट देणें असल्यास तें कर्त्यापूर्वी येतें. जसें:— **उठशील** कां लवकर? **करशील** अशानें चाकरी.

१६०. विशेषण विशेष्यापूर्वी असतें. जसें:—**शहाणा** मुलगा. परंतु विधिविशेषण विशेष्यापुढें येतें. जसें:—तो मुलगा **शहाणा** आहे.

१६१. एकाद्या नामाला **दर्शक** किंवा **संबंधी** सर्वनाम असेल तर तें त्या नामापूर्वी येतें. परंतु त्या नामावर विशेष नेट असेल तर तें पूर्वी येतें. जसें:—रामा हा **शहाणा** आहे.

१६२. एकाद्या नामाला सर्वनाम असून विशेषणही असेल तर प्रथम सर्वनाम, नंतर विशेषण व मग नाम अशी योजना असावी. जसें:—**तो** शहाणा मुलगा.

१६३. क्रियाविशेषण क्रियापदापूर्वी जवळच असावें. परंतु कित्येक कालवाचकें व स्थलवाचकें वाक्यारंभीं येतात. जसें:—**जिकडे** जावें **तिकडे** हेंच इ०.

टीप—उत्तेजनार्थ अ० निंदेनें बोलावयाचें असल्यास क्रियाविशेषण वाक्याच्या शेवटीं येतें. जसें:—भिऊं नको आतां. जाईल तो लवकर इ०.

१६४. कर्ता व कर्म खेरीज अन्यविभक्त्यन्त शब्द किंवा शब्दयोगीअव्यययुक्त शब्द बोलणाराच्या मर्जीप्रमाणें क्रियापदापूर्वी कोठेंही योजिले जातात.

१६५. संकेत-बोधक उभयान्वयी अव्ययें वाक्यारंभीं येतात. कारणबोधक उभयान्वयी अव्ययें मिश्रवाक्यांतील

प्रधानवाक्यापूर्वीं येतात. समुच्चयार्थक उभयान्वयी अव्यय, न्यूनत्वबोधक उभयान्वयी अव्यय आणि विकल्पदर्शक उभयान्वयी अव्यय हीं संयुक्त वाक्यांतील शेवटच्या वाक्यारंभीं येतात.

## कर्तरि प्रयोग.

१६६. कर्तरि प्रयोगांत क्रियापद कर्त्याच्या लिंगवचनांप्रमाणें असतें.

१६७. समुच्चयवाचक उभयान्वयी अव्ययानें जोडलेले अनेक कर्ते एकवचनी असले तरी क्रियापद अनेकवचनी असतें. जसें:—गंगा आणि वेणू आल्या.

१६८. परंतु जर हे कर्ते भिन्नलिंगी असतील तर क्रियापद नपुंसकलिंगी अनेकवचनी असतें. जसें:—गंगा आणि रामा हीं दोघें फिरावयास गेलीं. इ०.

१६९. समुच्चयार्थक उभयान्वयी अव्ययानें जोडलेल्या अनेक नामांपुढें अनेकवचनी दर्शकसर्वनाम किंवा त्यांचें जातिदर्शक नाम योजावें हें बरें. जसें:—गंगा व कुशी ह्या **मुली** शहाण्या आहेत.

टीप—अशा वेळेस उभयान्वयी अव्यय गाळलें तरी चालतें. जसें:—हत्ती, उंट, बैल हे पशु माणसाळलेले आहेत.

१७०. अनेक कर्ते विकल्पदर्शक उभयान्वयी अव्ययानें जोडल्यास क्रियापद जवळच्या कर्त्याच्या लिंगवचनांप्रमाणें असतें. जसें:—तेथें रामा किंवा गंगा **असावी.**

## कर्मणि प्रयोग.

१७१. कर्माच्या लिंगवचनांप्रमाणें क्रियापदाचें रूप असतें. परंतु अनेक कर्में समुच्चयवाचक उभयान्वयी किंवा विकल्पदर्शक उभयान्वयी अव्ययानें जोडलेलीं असलीं

तर क्रियापद शेवटच्या कर्माच्या लिंगवचनांप्रमाणें असतें. जसें :—त्यानें भाकर आणि **केळें** खाल्लें.

( अ ) अनेक कर्मपदें एकलिंगीच असतील तर त्याच लिंगी अनेकवचनी सर्वनाम त्यांपुढें कधीं कधीं योजून, क्रियापद त्या सर्वनामाला अनुसरणारें योजितात. जसें :—त्यानें ससा आणि मोर हे फांस मांडून **धरिले.**

( आ ) परंतु हीं अनेक कर्मपदें भिन्नलिंगी असल्यास त्यांपुढें नपुंसकलिंगी अनेकवचनी सर्वनाम योजून, क्रियापद त्या सर्वनामाला अनुसरणारें योजावें. जसें :—त्यानें शेत आणि बंगला **हीं** सर्व **विकलीं.**

( इ ) कधीं कधीं ह्या अनेक कर्मपदांपुढें त्यांचा जातिवाचक शब्द योजितात, तो अनेकवचनी असतो. परंतु लिंगाचा नियम नसतो. जसें :—त्यानें शिकारींत कांडगा, सिंह आणि वाघ हीं **जनावरें** मारिलीं.

( ई ) हा जातिवाचक शब्द त्या कर्मपदांचा समावेशक असला तर तो एकवचनी असतो. जसें :—त्यानें जांवयाला शेला, पागोटें आणि धोतरजोडा असा पोशाक केला.

**१७२.** अनेक नामें समुच्चयार्थक उभयान्वयी अव्ययानें जोडलीं असतां त्यांस विभक्तिप्रत्यय किंवा शब्दयोगी अ० लावणें असल्यास तें त्यांपुढें दर्शक सर्वनाम घालून त्यास लावावें. जसें:—वेणू व साळू **यांनीं** पोळ्या भाजल्या.

( अ ) पदवी, उपनांव किंवा विशेषण यांनीं युक्त नाम असतें त्यासही हाच नियम जाणावा. जसें:—नारायण विष्णु जोशी **यास**, दिल्लीचा बादशहा औरंगजेब **यानें** इ०.

१७३. आकारान्त पुल्लिंगी विशेषणें विशेष्याच्या लिंग-वचनांप्रमाणें बदलतात. व विशेष्याचें सामान्यरूप झालें तर त्या विशेषणाचेंही सामान्यरूप होतें. जसें:—**शहाणें मूल, शहाण्या** मुलास इ०.

टीप—कधीं अकारान्त विशेषणाचेंही सामान्यरूप होतें. जसें:-एके दिवशीं, उंचा हातानें इ०.

## अलंकार.

१७४. भाषेंत शोभा देऊन मनांत अर्थ ठसविणारीं जीं खुबीदार वाक्यें त्यांतील शोभेला किंवा खुबीला **अलंकार** ह्मणतात.

१७५. **शब्दालंकार** व **अर्थालंकार** असे अलंकाराचे दोन भेद आहेत.

१७६. अर्थालंकारांत—**उपमा, रूपक, सावयवरूपक, रूपकातिशयोक्ति, अपन्हुति, उत्प्रेक्षा, अन्योक्ति, दृष्टान्त, व्याजस्तुति, अत्युक्ति, सार, विरुद्धगुणन्यास, अनन्वय, चेतनगुणोक्ति, सिद्धान्त, विशेषार्थ, प्रश्न, अर्थान्तरन्यास, निदर्शना, अनुगुणालंकार,** इ० आहेत.

१७७, दोन पदार्थांचें साम्य वर्णितात तेथें **उपमालंकार** जाणावा. जसें:—त्याचे **शब्द अमृततुल्य** वाटतात.

१७८. दोन वस्तु एकच आहेत अशी तुलना करून दाखविलें असतें, तेथें **रूपकालंकार** जाणावा. जसें:—**मनुष्य राक्षसच** आहे. **तो** कलियुगांतील **भीमच** आहे.

१७९. दोन वस्तूंच्या अवयवांची अभिन्न तुलना करितात तेथें **सावयवरूपकालंकार** जाणावा. जसें:—

॥ ओवी ॥

सरला **सुकृताचा तंतू** ॥ **आयुष्यतैला** झाला अंतू ॥
माझिये हस्तीं **व्यजनवातू** ॥ **भीमरूपें** उदेला ॥ १ ॥
तो झडपतां सत्वरगती ॥ **प्राणदीपपंचज्योती** ॥
मालवोनी पडेल क्षिती ॥ **गात्रपात्र** पालथें ॥ २ ॥

१८०. ज्या रूपकांत उपमेय दाखविलें नसतें, उपमानावरूनच उपमेयाचा बोध होतो, त्यास **रूपकातिशयोक्ति** ह्मणतात. जसें:–**जंबुकाला सिंहकन्या** माळ घालील?

१८१. ज्या अलंकारांत उपमेयाचा अपलाप करून उपमानाचा आरोप करितात त्यास **अपन्हुति** ह्मणतात. जसें:–तो अपशब्द बोलला नाहीं, तर त्यानें माझ्या उरांत **बाण** मारिला.

१८२. उपमेयाला हें उपमानच काय- असें वर्णितात त्यास **उत्प्रेक्षा** ह्मणतात. जसें:–**हा** भीमच काय?

१८३. प्रकृत गोष्टीचा बोध अप्रकृत गोष्टीच्या वर्णनानें करितात तेथें **अन्योक्ति** म्हणतात. जसें:–कडू **कारलें,** तुपांत तळलें, साखरेंत घोळलें, तरी कडू तें कडूच.

१८४. प्रकृतार्थ मनांत ठसविण्याकरितां अप्रकृतार्थाचें उदाहरण देतात त्यास **दृष्टान्त** म्हणतात. जसें:–**रोगाची** उपेक्षा केली असतां रोग वाढतो, तशी **शत्रूची** उपेक्षा केली तर शत्रु वाढतो.

१८५. जेथें वर स्तुति परंतु खरोखर निंदा असते तेथें **व्याजस्तुति** म्हणतात. जसें:–( कृतघ्नाला ) आपण **चांगले उपकार फेडलेत** इ०.

टीप—वर निंदा परंतु वास्तविक स्तुति जेथें असते तेथें व्याजनिंदा असें ह्मणतात. जसें:–तुह्मी मोठे उदार, परंतु परस्त्रीला हृदय देत नाहीं; व शत्रूला पाठ देत नाहीं.

१८६. योग्यते पलीकडे वर्णन केलें ह्मणजे **अत्युक्ति** होते. जसें:-**असा उन्हाळा** मी जन्मांत पाहिला नाहीं.

१८७. एकाहून दुसरी वस्तु अधिक, दुसरीहून तिसरी अधिक असें वर्णन केलें म्हणजे **सारालंकार** होतो. जसें:-**प्राणा**करितां **द्रव्य** खर्चावें व **देशा**करितां प्राणही बळी द्यावा.

१८८. दोन विरुद्ध गुणांच्या वस्तूंचें एकत्र उद्भावन करून त्यांचा भेद दाखविणें यास **विरुद्धगुणन्यास** ह्मणतात. जसें:-**माधवरावा**सारख्या **चतुर, शूर, फौजबंद** पुरुषाच्या हातून इंग्रजाचा पराभव झाला नाहीं, तो करावयास **बाजीराव** हा **मूर्ख, भेकड व तुटपुंज्या फौजेचा** असून पुढें होतो!

१८९. एकाद्या वस्तूस त्याच वस्तूची उपमा देणें यास **अनन्वयालंकार** म्हणतात. जसें:-**कर्णा**सारखा उदार **कर्ण**च.

१९०. अचेतन पदार्थांचें सचेतन पदार्थाप्रमाणें वर्णन केलें ह्मणजे **चेतनगुणोक्ति** अलंकार होतो. जसें:-त्या कंत्राटदाराला **सागवानानें हात** दिला.

१९१. अशक्य गोष्ट शक्य होईल, परंतु अमुक घडणार नाहीं असें सांगितलें ह्मणजे त्याला **सिद्धान्त** म्हणतात. जसें:-**दगडाला** पाझर येईल; पण **साला** द्रव येणार नाहीं इ०.

१९२. वाक्यांत एकाद्या शब्दाचा नेहमींचा अर्थ नसून खुबीचाच अर्थ असतो त्यास **विशेषार्थ** ह्मणतात. जसें:-त्यानें एका बुक्कीनें **राम** ह्मटला.

१९३. वाक्य प्रश्नासारखें दिसावें, परंतु त्यांत बोल-

णाराची खातरी असावी. अशा ठिकाणीं **प्रश्नालंकार** ह्मणतात. जसें:–कालिदासासारखा **कोण कवि** आहे ?

१९४. विशेष गोष्ट व तिच्या पुष्टीकरणार्थ एक सामान्य गोष्ट सांगितली ह्मणजे **अर्थान्तरन्यासालंकार** होतो. जसें:–**अगस्तीनें** समुद्राचें एक आचमन केलें! ठीकच आहे. **थोरांना** दुष्कर काय आहे ?

१९५. प्रस्तुत गोष्ट मनांत विशेष भरण्याकरितां एकादें उदाहरण देतात, त्याला **निदर्शनालंकार** म्हणतात. जसें:–**त्याला** शिकविणें, हें **उपड्या घड्यावर** पाणी घालणें होय.

१९६. एखाद्या गुणास किंवा दुर्गुणास दुसरे गुण किंवा दुर्गुण अनुकूल झाले असें वर्णन केलें ह्मणजे त्यास **अनुगुणालंकार** ह्मणतात. जसें:–आधींच **उल्लास**, त्यांत **फाल्गुनमास.** आधींच **मर्कट** तशांतहि **मद्य** प्याला इ०.

## विरामचिन्हें.

१९७. ग्रंथ वाचतांना ऐकणाराला स्पष्ट अर्थ समजण्यासाठीं मध्यें मध्यें थांबावें लागतें, किंवा उच्चारणाचा रोंख बदलावा लागतो; त्या ठिकाणीं ज्या योग्य चिन्हांची योजना करितात त्यांस **विरामचिन्हें** ह्मणतात. तीं चिन्हें, त्यांचीं नांवें व त्यांचा उपयोग यांविषयीं सांगतों.

१९८. ( , ) हा **स्वल्पविराम** (थोडा वेळ थांबणें). समान योग्यतेचीं पदें वाक्यांत एकापुढें एक आलीं ह्मणजे त्या प्रत्येकापुढें याची योजना करितात. जसें:–रामा, कृष्णा व हरि यांना लिहितां, वाचतां, कसरत करितां येते.

१९९. मिश्रवाक्यांतील गौणवाक्यें व कधीं कधीं संयुक्तवाक्यांतील प्रधानवाक्यें निराळीं दाखविण्याकरितां

स्वल्पविराम योजितात. जसें:-( मिश्रवाक्य. ) पाऊस पडेल, असें मला वाटतें. ( संयुक्तवाक्य. ) तुमचा खेळ होतो, पण आमचा जीव जातो.

टीप—उभयान्वयीअव्ययानें जोडलेल्या शब्दांपुढें किंवा वाक्यांपुढें विरामचिन्हाची बहुतकरून आवश्यकता नाहीं.

२००. संबोधनान्त नामापुढें **स्वल्पविराम** योजावा. जसें:-गड्यांनों, हा खरें बोलतो.

२०१. ( ; ) हा **अर्धविराम** (स्वल्पविरामाच्या दुप्पट). संयुक्तवाक्यांतील प्रधानवाक्यें पूर्ण असूनही त्यांचा पुढील प्रधानवाक्यांशीं संबंध असला तर प्रत्येकापुढें ह्याची योजना करितात: जसें:-एका गृहस्थाचे दोन मुलगे होते; एकाचें नांव सदू व एकाचें नांव महादू.

टीप—परंतु संयुक्तवाक्यांतील अनेक प्रधानवाक्यांचा कर्ता एकच असल्यास, तीं वाक्यें स्वल्पविरामानेंच निराळीं दाखवावीं. जसें:-तो शाळेंत गेला, कांहीं वेळ तेथें राहिला आणि घरीं आला.

२०२. (.) हा **पूर्णविराम** (स्वल्पविरामाच्या चौपट). वाक्य पूर्ण असून, त्याचा दुसऱ्या वाक्याशीं संबंध नसला, ह्मणजे त्यापुढें ह्याचा उपयोग करावा.

टीप—प्रत्येक शुद्ध, मिश्र व संयुक्त वाक्याच्या शेवटीं पूर्णविराम योजावा.

२०३. ( ? ) हा **प्रश्नविराम**. ज्या वाक्यानें प्रश्न होतो त्याच्या शेवटीं या चिन्हाची योजना करावी.

२०४. ( ! ) हें **उद्गारचिन्ह**. ज्या शब्दानें अथवा शब्दसमूहानें मनोविकारांचा बोध होतो, त्यापुढें याची योजना करावी.

२०५. ( – ) हें **संयोगचिन्ह**. एखाद्या वाक्याचा स्पष्टार्थ करण्याकरितां त्यांत दुसरेंच वाक्य लिहिणें

झाल्यास तें वाक्य या चिन्हानें जोडतात. जसें:—आह्मी खोलींत निजूं—दादा व मी.

**२०६. ( ) हा कंस.** एकाद्या वाक्यांतील वाक्यांश गाळिला असतां चालतो, परंतु त्याच्या उल्लेखानें त्या वाक्याचा विशेष स्पष्ट अर्थ होतो, तो वाक्यांश कंसांत योजितात.

**२०७. ( " " ) हें अवतरणचिन्ह.** एकाद्या ग्रंथांतील वाक्य किंवा एकाद्या वक्त्याच्या तोंडचें वाक्य तसेंच लिहावयाचें असतां ह्या चिन्हांत लिहितात.

## लेखनशुद्धि.

### अनुस्वाराविषयीं.

१ **तूं** ह्या सर्वनामावर नेहमीं अनुस्वार असतो.

२ **ई—ऊ—ए**—कारान्त एकवचनी किंवा अनेकवचनी नपुंसकलिंगी नामाच्या अंत्यावर अनुस्वार द्यावा—अपवाद —पाणी, लोणी इ०.

३ नपुंसकलिंगी नामाचीं विशेषणें दर्शकसर्वनामें किं० संबंधीसर्वनामें **ई—ऊ—ए**—कारान्त असतील तर त्यांच्या अंत्यावर अनुस्वार द्यावा. जसें:—**तें** केळें; **हिरवीं** पांखरें इ०.

४ **ई—ऊ**—कारान्त विशेषणें तिन्ही लिंगी असतील तर अनुस्वार नको. जसें:—**कडू** भोंपळा, **कडू** तोंडलें इ०.

५ तृतीयेच्या व सप्तमीच्या प्रत्ययांवर अनुस्वार असतो.

६ नामाच्या अनेकवचनी सामान्यरूपांवर व **आंत** व **आंतून** हीं अव्ययें ज्या शब्दांला लागणार त्यांच्या सामान्यरूपांवर अनुस्वार द्यावा.

८ हळू, जलदी, कडे इ० अव्ययें अपवादक आहेत.

९ पुढील सानुस्वार शब्द लक्षांत ठेवण्यासारखे

आहेत—नाहीं, कांहीं, परंतु, कां, कीं, किंवा, जों, तों, जंव, तंव, एवीं, तेवीं, संशय, संवाद, कंस, सिंह, संसार, जेंवी, केंवी, संयोग, संज्ञा. इ०.

## ऱ्हस्व, व दीर्घ यांविषयीं.

१० मराठींत ई–ऊ–कारान्त शब्द दीर्घच असतात. अपवाद–आणि.

११ परंतु संस्कृत ऱ्हस्व इ–उ–कारान्त शब्द ह्या भाषेंत बरेच आहेत. त्यांतील वारंवार येणारे कांहीं शब्द येथें देतों—यद्यपि, तथापि, किमपि, परंतु, कवि, रवि, हरि, भानु, धेनु, नीति, भूमि, गीति, दीप्ति, रुचि, मति, कृति इ०. ह्या शब्दांस विभक्तिप्रत्यय लागले असतां त्यांचा अंत्य दीर्घ होतो.

१२ ऱ्हस्व इ–उकारान्त अक्षर मराठी शब्दांत केव्हां व कोठें असतें तें—

एकाच शब्दांत दोन अक्षरांपूर्वींचें. उ० करितात, रिकामा, दिवाणी, पुरावा इ०.

जोडाक्षर किंवा दीर्घ अक्षर यांपूर्वींचें. उ० पिच्छा, रिता.

ज्या अक्षरावर अनुस्वार असून त्याचा स्पष्ट उच्चार होतो तें. जसें:–सुंठ, चिंच इ०.

रेफापूर्वींचें अक्षर दीर्घ असतें. जसें:–जीर्ण, सूर्य, पूर्व इ०; अपवाद–चातुर्य, माधुर्य इ० भाववाचक नामें.

१३ पुढील शब्द ध्यानांत ठेवण्यासारखे आहेत: विदूषक, गुण, कठिन, हरिण, सुत, शिर, विष, निपुण, टीका, कुल, फाल्गुन, आश्विन, परीक्षा इ०.

## व्याकरण लावणें.

शब्दाची जाति, त्यास झालेला विकार व त्याचा इतर

शब्दाशीं असलेला संबंध इ० सांगणें ह्यास व्याकरण लावणें अथवा व्याकरण करणें ह्मणतात.

१ **पक्षी** उडतो—**पक्षी** या ईकारान्त पुल्लिंगी **सामान्यनामाचें** प्रथमेचें एकवचन. या प्रथमेचा अर्थ **कर्ता उडतो** या क्रियापदाचा.

२ त्याला **रागानें** ग्रासिलें—**राग** या अकारान्त पुल्लिंगी **भाववाचकनामाचें** तृतीयेचें एकवचन. या तृतीयेचा अर्थ **कर्ता ग्रासिलें** या क्रियापदाचा.

३ **शहाण्याला** सर्व समजतें—**शहाणा** या आकारान्त पुल्लिंगी **सामान्यनामीभूत** विशेषणाचें चतुर्थीचें एकवचन. अर्थ **अधिकरण, समजतें** या क्रियापदाचें.

**टीपः**—सामान्यनामीभूत विशेषण ह्म० मूळचें-विशेषण असून सामान्यनाम झालेलें. अव्ययीभूत सर्वनाम ह्म० सर्वनाम असून अव्यय झालेलें. याचप्रमाणें अशा प्रकारच्या शब्दांचा अर्थ समजावा.

४ **आईबापांनीं** त्याला वाढविलें—**आईबाप** या अकारान्त पुल्लिंगी **द्वंद्वसामासिकसामान्यनामाचें** तृतीयेचें अनेकवचन. या तृतीयेचा अर्थ **कर्ता वाढविलें** या क्रियापदाचा.

५ तो **घोड्यावर** बसला—**घोडा** या आकारान्त पुल्लिंगी सामान्यनामाचें **सामान्यरूप. वर** या **शब्दयोगी** अव्ययाच्या योगानें.

६ **या घरांतील** माणसें—**तें** या नपुंसकलिंगी **दर्शकसर्वनामाचें सामान्यरूप. घर** या संबंधी नामाच्या सामान्यरूपामुळें.

७ तो **बागेंत** गेला—**बाग** या अकारान्त स्त्रीलिंगी

सामान्यनामाचें **सामान्यरूप. आंत** या शब्दयोगी अव्ययाच्या योगानें.

८ **मी** येईन–**मी** या **प्रथमपुरुषसर्वनामाचें** प्रथमेचें एकवचन. अर्थ **कर्ता येईन** याचा.

९ **तूं** जा–**तूं** या पुल्लिंगी **द्वितीयपुरुषसर्वनामाचें** प्रथमेचें एकवचन. अर्थ **कर्ता जा** या क्रियापदाचा.

टीप १—वाक्यांतील कित्येक पुरुषसर्वनामांचा लिंगनिर्णय बराबर होत नाहीं, तेथें त्यांचें पुल्लिंग समजावें. कारण, सामान्यतः प्राणिवाचक नामावर कोणतेंही विधान करणें झाल्यास तें पुल्लिंगास लक्षून करितात. जसें:-आर्य लोक बुद्धिमान आहेत.

टीप २—नामाशिवाय इतर शब्दांचा अंत सांगण्याची बहुधा गरज लागत नाहीं.

१० **आपण** आलां–**आपण** या पुल्लिंगी **द्वितीय-पुरुषसर्वनामाचें** प्रथमेचें अनेकवचन. या प्रथमेचा अर्थ **कर्ता, आलां** या क्रियापदाचा.

११ **तें** घे–**तें** या नपुंसकलिंगी **तृतीयपुरुषसर्वनामाचें** प्रथमेचें एकवचन. अर्थ **कर्म** घे ह्या क्रियापदाचें.

१२ **तें** पुस्तक घे–**तें** या नपुंसकलिंगी **दर्शकसर्वनामाचें** प्रथमेचें एकवचन. अर्थ **उद्देश** पुस्तकाकडे.

१३ **शहाणा** मुलगा–**शहाणा** या पुल्लिंगी **गुणवि-शेषणाचें** प्रथमेचें एकवचन. याचा संबंध **मुलगा** या नामाकडे.

१४ **पांच** आंबे आण–**पांच** या पुल्लिंगी **संख्या-विशेषणाचें** प्रथमेचें अनेकवचन. याचा संबंध आंबे या नामाकडे.

१५ मी **जातों**—हें क्रियापद **जा** या अकर्मकधातूचें-करण-रूपी, मूळरूपभेदी, स्वार्थी, वर्तमानकाळीं, पुल्लिंगीं, **प्रथम-**

**पुरुषीं**, एकवचन. या वाक्यांत **मी** हा कर्ता आणि **जातों** हें क्रियापद, हा **अकर्मककर्तरि प्रयोग.**

१६ तूं **बसलास**—हें क्रियापद. **बस** या अकर्मकधातूचें—करणरूपीं, मूळरूपभेदीं, स्वार्थीं, **भूतकाळीं**, पुल्लिंगीं, **द्वितीयपुरुषीं** एकवचन. यांत **तूं** हा कर्ता आणि **बसलास** हें क्रियापद, हा **अकर्मककर्तरि प्रयोग.**

**१८ रामानें तें केलें नाहीं—रामा** या आकारान्त पुल्लिंगी विशेषनामाचें तृतीयेचें एकवचन. तृतीयेचा अर्थ कर्ता **केलें नाहीं** या क्रियापदाचा. **तें**—या नपुंसकलिंगी **तृतीयपुरुषसर्वनामाचें** प्रथमेचें एकवचन. या प्रथमेचा अर्थ कर्म **केलें नाहीं** या क्रियापदाचें. **केलें नाहीं**—हें संयुक्त क्रियापद. **कर** या **सकर्मकधातूचें**—अकरणरूपीं, मूळरूपभेदीं, स्वार्थीं, पूर्णवर्तमानकाळीं, नपुंसकलिंगीं, तृतीयपुरुषीं, एकवचन. या वाक्यांत **रामानें** हा कर्ता, **तें** हें कर्म आणि **केलें नाहीं** हें क्रियापद, हा **कर्मणि प्रयोग.**

११ तूं **जा**—हें क्रियापद. **जा** या अकर्मकधातूचें—करणरूपीं, मूळरूपभेदीं, **आज्ञार्थीं**, वर्तमानकाळीं, पुल्लिंगीं, द्वितीयपुरुषीं, एकवचन. या वाक्यांत **तूं** हा कर्ता आणि **जा** हें क्रियापद, हा **अकर्मककर्तरि प्रयोग.**

१२ त्यानें **जावें**—हें क्रियापद. **जा** या अकर्मकधातूचें—करणरूपीं, मूळरूपभेदीं, **विध्यर्थीं**, वर्तमानकाळीं, नपुंसकलिंगीं, तृतीयपुरुषीं, एकवचन. यांत **त्यानें** हा कर्ता आणि **जावें** हें क्रियापद हा **अकर्मकभावे प्रयोग.**

१३ जर तो काम **करिता**—हें क्रियापद. **कर** या सकर्मकधातूचें—करणरूपीं, मूळरूपभेदीं, **संकेतार्थीं**. भूत-

काळीं, पुल्लिंगीं, तृतीयपुरुषीं, एकवचन. या वाक्यांत **तो** हा कर्ता, **काम** हें कर्म आणि **करिता** हें क्रियापद, हा **सकर्मककर्तरि प्रयोग.**

१४ **त्यानें त्याला वसविलें. त्यानें**—तो या पुल्लिंगीं **तृतीयपुरुषसर्वनामाचें** तृतीयेचें एकवचन. ह्या तृतीयेचा अर्थ कर्ता **वसविलें** ह्या क्रियापदाचा. **त्याला**—तो या पुल्लिंगीं तृतीयपुरुषसर्वनामाचें चतुर्थीचें एकवचन. ह्या चतुर्थीचा अर्थ कर्म **वसविलें** ह्या क्रियापदाचें. **वसविलें** हें क्रियापद. **वस** या **सकर्मकीभूत अकर्मकधातूचें**—करणरूपीं, **प्रयोजकभेदीं,** स्वार्थीं, भूतकाळीं, नपुंसकलिंगीं, तृतीयपुरुषीं, एकवचन. या वाक्यांत **त्यानें** हा कर्ता, **त्याला** हें कर्म आणि **वसविलें** हें क्रियापद हा **सकर्मकभावे प्रयोग.**

१५ त्याला काम **करवतें**—हें क्रियापद. **कर** या सकर्मकधातूचें—करणरूपीं, **शक्यभेदीं,** स्वार्थीं, **वर्तमानकाळीं,** नपुंसकलिंगीं, तृतीयपुरुषीं, एकवचन. या वाक्यांत **त्याला** हा कर्ता, **काम** हें कर्म आणि **करवतें** हें क्रियापद, हा **कर्मणि प्रयोग.**

१६ नऊ **वाजल्यावर**—**वाजला** या पुल्लिंगीं, मूळरूपभेदीं, **वाजधातुसाधितभूतकालिकविशेषणाचें सामान्यरूप**-वर या शब्दयोगीअव्ययाच्या योगानें.

१७ तुह्मी **आल्यानें** अ० **आल्यास** काम होईल—हें मूळरूपभेदीं **येधातुसाधित भू० का० क्रि० वि० होईल** या क्रियापदाचें. याचा हेत्वर्थी अन्वय.

१८ काम **करावयास नको**—करावयास हें मूळरूपभेदीं, करधातुसाधित **भविष्यकालवाचकक्रियाविशेषण** अव्यय—**नको** या क्रियापदाचें.

१९ अभ्यास **करितांना** खेळूं नये—हें मूळरूपभेदीं, **करधातुसाधित वर्तमानकालवाचक क्रियाविशेषण** अव्यय, **खेळूं नये** या संयुक्तक्रियापदाचें.

२० कपडे **फाटून** गेले—हें मूळरूपभेदीं, **फाटधातुसाधितभूतकालवाचकक्रियाविशेषण** अव्यय, **गेले** या क्रियापदाचें.

**२१** दारिद्र्य **घालवावयास** उद्योग अवश्य पाहिजे—हें प्रयोजकभेदीं **घालधातुसाधितभाविष्यकालवाचकक्रियाविशेषण** अव्यय, **पाहिजे** या क्रियापदाचें.

## व्याकरणविशेषद्योतक वाक्यें.

**चांगलें** मूल—हें विशेषण मुलाचें.

तो **चांगलें** लिहितो—हें क्रियाविशेषणीभूतविशेषण.

**चांगलें** सर्वांस आवडतें—हें नामीभूतविशेषण.

**चांगलें**! असेंच कर—के० प्र० अव्ययीभूत वि०.

काम झालें **पण** कच्चें—न्यूनत्वबोधक उभयान्वयी अ०.

तुझें तें **पण** मला नको—सामान्यनामीभूत अव्यय.

हें काय **पण** असें—वाक्यालंकारार्थक अव्यय.

श्रम पडले, **वरता** बैल गेला—उभयान्वयीभूत वि०.

**वरता** बैस—हें स्थलवाचकक्रियाविशेषणीभूत विशेषण.

रामा **ह्मणून** मुलगा आहे—विशेषणीभूत अव्यय.

असें **ह्मणून** तो गेला—भूतकालवाचक अव्यय.

तूं आलास **ह्मणून** तो सुटला—कारणोभयान्वयी अव्यय.

तो **ह्मणून** ऐकेना—अवधारणार्थक उभयान्वयी अव्यय.

शिकावें **ह्मणून** किती—निर्धारणार्थक उभयान्वयी अ०.

असें कां **ह्मणून** विचारितो—स्वरूपबोधक उभयान्वयी.

त्या संकटांत तो **ह्मणून** वाचला—व्यावृत्त्यर्थक उ०अ०.

अश्व **ह्मणजे** घोडा—स्वरूपबोधक उभयान्वयी अव्यय.

तो आला **ह्मणजे** काम झालें—पूर्णताबोधक उभयान्वयी.

त्यानें केलें **ह्मणजे** मी करीन—संकेतोभयान्वयी अव्यय.

तो **ह्मणजे** हें करील }
असें मला नाहीं वाटत } —असंभवबोधक उभयान्वयी.

**हा** मूर्खा—केवलप्रयोगी अव्यय.

त्या घोड्याचा एकेक **हा** पाय—विशेषणीभूत सर्व नाम.

त्यानें मारिलें **कीं** तूं मार—संकेतोभयान्वयी अव्यय.

तूं ब्राह्मण **कीं** शूद्र—पक्षान्तरबोधक उभ० अव्यय.

आलों **कीं**—हें वाक्यपूरक अव्यय.

तो ह्मणतो **कीं** मी येतों—स्वरूपबोधकोभयान्वयी अ०.

मी तुला रागावतों **कीं** तूं चाळे करूं नये—कारणोभ०.

तो आला **का**?—प्रश्नार्थक क्रियाविशेषण अव्यय.

तूं **कां** आलास?—कारणप्रश्नार्थक क्रियाविशेषण अ०.

उठला **तो** पळत सुटला—क्रि० वि० भूत द०स०ना०.

रामा आला नाहीं **तो**?—प्रश्नार्थक अव्ययीभूत सर्वना०.

एक **ते** पांच अंक करूं—अव्ययीभूत द०स०ना०.

तो आला **काय**?—प्रश्नार्थक क्रियाविशेषण अव्यय.

**काय** पाहिजे तें कर—संबंधी सर्वनाम.

**काय** चमत्कार पहा—विशेषणीभूत सर्वनाम.

त्यानें **घरान** ( घरामागून ) घर धुंडिलें—हें क्रियावि०.

**सोनपतपानपत** येथें—अर्थ उद्देश्य येथें याचा.

त्याच्या पोटांत **दुखतें**—अकर्तृक क्रियापद.

मला इतकीं बोरें **पुरत**—क्रियापद. कवितेंतील वर्त०.

त्याला मारशील **एखादा**—संशयार्थककालवा०क्रि०वि०.

आला **एकदांचा**—कालवाचकक्रियावि० आला याचें.

तूं **सा** आलास—**सा** हें असंभवबोधकक्रियाविशेषण.
विश्वास **नाहींसा** झाला—क्रियाविशेषण झाला याचें.
तो काय **दगड** शिकणार—क्रियाविशेषणीभूत नाम.
**मंगळवारचे** मंगळवारीं—अनुक्रमव्यावृत्ति द० वि०.
ती निजली **ती** निजली—क्रि०वि०अ०भू० द०स०ना०.
त्यानें **मार मार** मारिलें—क्रियाविशेषण अतिशयार्थ.
**नाहीं नाहीं** (भलतें) तें बोलतो—विशेषणीभूत क्रियापद.
कांहीं **ना** ( नाहीं ) कांहीं कर—क्रियापदीभूत अव्यय.
**दिवसें** दिवस—अपादानार्थी तृतीया.

## पद्यांतील शब्दांच्या विशेष रूपांविषयीं.

### नामें व सर्वनामें.

| | | | |
|---|---|---|---|
| ( अ ) | प्रथमा | भावू, | भावो. |
| | तृतीया | भावें, | भावीं. |
| | चतुर्थी | भावासी-शी, | भावा. |
| | पंचमी | घरुनि, घरोनी, | घरोनिया, घरुनिया. |
| | सप्तमी | घरीं, | घरां. |
| | च० | मातें, तूतें(ए.व.) | आमुतें, तुह्मांतें (अ.व.) |
| | षष्ठी | मम, तव ,, | आमुचा ,, |

टीप—ती, ही, जी यांचीं तें, हें, जे अशीं रूपें होतात.

आ ) घोडियावरी, कडियेवरी, मांडियेवरी इ० सा० रू०.

### क्रियापदें.

| वर्तमान काळ सक० धातु. | वर्त० का० अकर्म० धातु. |
|---|---|
| मी करीं आह्मी करूं-करो. | मी बसें आह्मी बसूं-बसों. |
| तूं करिसी तुह्मी करूं-करां. | तूं बससी तुह्मी बसां. |
| तो करी ते करिती. | तो बसे ते बसती. |

टीप १—या रूपांचा भूतकाळीं सुद्धां प्रयोग होतो.

टीप २—कांहीं क्रियापदांचीं भूतकाळाचीं रूपें विलक्षण असतात. जसें:- थावित्रला, गर्जित्रला, पातली, हाणीतले, जाहली, हरतिली इ०. व दे ने, पी, इ०. कित्येक एकाक्षरी धातु व वर्तमान व भूत यांबद्दल योजितात.

आज्ञार्थ—घेई, धांवें, करीं, करो.

## कर्मणि क्रियापदें.

वर्त० का०—करिजे, कीजे, कीजसी, कीजती, इ०.

भू० का०—करिजेलें; भवि० का० करिजेल इ०.

**मला** हें काम करितां **कामा** नये—मला ही कर्तरि चतुर्थी. करितां याचा कर्ता. कामा ही प्रत्ययाभाव चतुर्थी. अधिकरण नये याचें.

इ० स० १७६१ त लढाई झाली—इसवी हें विशेषनाम प्रथमैकवचन. याचें उद्देश्य सन. सन सा०ना०, प्र०ए०. याचा संबंध १७६१ याकडे. १७६१ ह्म० १७६१ वें. हे नामीभूत क्रमसंख्याविशेषण सप्तमीचें एकवचन.

ह्या चाकूनें आंबा **कापतो** ( कापला जातो )—कर्मणि क्रियापद.

**हां हां** ह्मणतां—नामीभूत अव्यय.

**काय** ह्मणतो?—प्रश्नार्थक सर्वनाम.

**उभ्यानें** पाणी पितो—क्रि० वि० पितो याचें.

तो इकडे **बघ**, तिकडे **बघ**, असें करितो—बघावें **या** अर्थी क्रियापद.

**समाप्त.**

